


कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine February 2026 - Pages - 52

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे

कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७७ * अंक ४ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी
डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक येथील
माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग स्नेहसंमेलन आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी
प्रमुख पाहुणे डॉ. हेमंत आप्पासाहेब सोननीस (मानसोपचार तज्ज्ञ)
यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
समवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ✻




दि. २८ जानेवारी २०२६ रोजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यास पारितोषिक देताना प्रमुख पाहुणे श्री. राजेश कंकाळ (शिक्षण उपसंचालक, मुंबई) समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, विशेष अतिथी संस्थेचे उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे



प्राथमिक इंग्रजी विभाग
दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी
प्रमुख पाहुणे श्री. किसन पावडे
(प्रशासकीय अधिकारी एफ उत्तर बीएमसी शिक्षण विभाग)
यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे




प्राथमिक इंग्रजी विभाग दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यास पारितोषिक देताना विशेष अतिथी श्री. संकेत वैद्य (उपाध्यक्ष, जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड व माजी विद्यार्थी) समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, प्रमुख पाहुणे श्री. किसन पावडे (प्रशासकीय अधिकारी एफ उत्तर बीएमसी शिक्षण विभाग), आदी मान्यवर

## ✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✻



दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी दीप प्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, देणगीदार श्रीमती सिंधूताई धामणकर, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य आणि श्रीमती भारती पाटील

संपादकीय

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

साधारणतः पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रामध्ये जे एक सामाजिक आणि वैचारिक परिवर्तन होऊ लागले, त्यामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियाही सक्रिय होत्या.

त्या काळात समाजात स्त्रियांना सर्वसाधारणतः एक दुय्यम स्थान होते. समाजात खऱ्या अर्थाने सुधारणा करायची असेल, रुजवायची असेल तर, समाजातील स्त्रियांची ही अगतिक परिस्थिती बदलली पाहिजे हे लक्षात घेऊन त्या काळात पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. रखमाबाई राऊत, बया कर्वे, ताराबाई शिंदे आदी स्त्रियांनी स्त्रीचे सामाजिक हक्क, स्त्री शिक्षण अशा विविध क्षेत्रात हिरहिरीने जे सामाजिक कार्य केले त्यामध्ये सावित्रीबाई फुले या अग्रणी होत्या.

सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे नेवासे पाटील घराण्यात सावित्रीबाईंचा जन्म झाला. नेवासे पाटील हे त्या गावातले एक तालेवार घराणे, तालीकोटच्या लढाईत पाटील यांच्या पूर्वजांनी मोठा पराक्रम केला होता. त्यामुळे त्यांना इनामदारीचा आणि पाटिलकीचा मान मिळाला होता. घरात संपन्नता असली तरी, पाटलांच्या घराण्यात सावित्राबाईंवर डोळसपणे संस्कार केले जात होते. शेतावर जाणे, गुरेढोरे सांभाळणे, गाईम्हशींच्या धारा काढणे, स्वयंपाक करणे आदी कामे त्या करत. सावित्रीबाई पोहण्यात आणि गोफण फिरवण्यातही निष्णात होत्या. लहानपणापासूनच त्या अन्यायाविरूध्द उभ्या रहात त्यामुळे, गावातल्या मुलामुलींचे पुढारीपण आपोआपच त्यांच्याकडे आले होते.

त्या काळातील प्रथेनुसार इ. स. १८४० मध्ये त्यांच्या वयाच्या नवव्या वर्षी सावित्रीबाईंचा विवाह जोतीराव फुले यांच्याशी झाला. लग्नानंतर सावित्रीबाईंची शिक्षणाची आवड लक्षात घेऊन जोतीरावांनी आपल्या बहिणीबरोबर, सगुणाबाईंबरोबर सावित्रीबाईंनाही शिक्षणाचे धडे द्यायला सुरूवात केली. अक्षर ओळख, लेखन वाचन, पाढे, बेरीज - वजाबाकी, इतिहास, भूगोल, सामान्यज्ञान आदी विषय जोतीरावांनी त्यांना शिकविले. मिसेस मिचेल यांनी या दोघींची परीक्षा घेतली. या दोघींची शैक्षणिक तयारी आणि हुशारी पाहून या दोघींनी शिक्षिकेचा कोर्स पूर्ण करण्याचा मिचेल बाईंनी आग्रह धरला. या दोघींच्या गुणवत्तेनुसार मिचेलबाईंनी त्यांना थेट तिसऱ्या वर्गात प्रवेश दिला. १८४७ मध्ये प्रशिक्षणाचे चौथे वर्ष पूर्ण करून सावित्रीबाई व सगुणाबाई उत्तम प्रशिक्षित शिक्षिका झाल्या. महाराष्ट्रातल्या या पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका.

त्यानंतर जोतीरावांनी या दोघींचा सल्ला घेऊन १ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथे बुधवार पेठेतील भिडेवाड्यात महाराष्ट्रातील पहिली मुलींची शाळा सुरू केली.

शैक्षणिक कार्य करताना तत्कालीन समाजाकडून सावित्रीबाईंना खूपच विरोध सहन करावा लागला. परंतु सावित्रीबाईंनी त्या छळाकडे पूर्ण दुर्लक्ष केले. वेळप्रसंगी गुंडांशी दोन हात करीत त्यांनी आपले अंगीकृत कार्य नेटाने चालू ठेवले. इ. स. १८४८ ते १८५२ या चार वर्षांच्या काळात या जोडप्याने पुणे परिसरात वीस शाळा उघडल्या व त्या व्यवस्थितपणे चालवल्या. जोतीराव आणि सावित्रीबाईंचे हे शैक्षणिक कार्य पाहून, सरकारी शिक्षा मंडळीने इंग्रज सरकारला या दोघांचा जाहीर गौरव करण्याची सूचना केली. मेजर कँडी यांच्या अध्यक्षतेखाली इंग्रज सरकारने त्या काळात १९३ रुपयांच्या दोन शाली देऊन फुले दांपत्याचा जाहीर सत्कार केला. या प्रसंगी सावित्रीबाईंना उद्देशून जोतीराव म्हणाले होते, 'हा गौरव तुझाच गौरव आहे. मी शाळा

स्थापण्यास कारणमात्र आहे. पण त्या शाळा तू अनेक संकटांशी तोंड देऊन यशस्वीरित्या चालविल्यास याचा मला अभिमान वाटतो.

शैक्षणिक कार्याबरोबरच जोतीराव आणि सावित्रीबाईंनी अस्पृश्यते विरुध्दही लढा पुकारला होता. अस्पृश्यता निवारण संदर्भात केलेल्या एका भाषणात सावित्रीबाई म्हणाल्या होत्या, 'सर्व मानव ही एका ईश्वराची लेकरे आहेत. हे जोपर्यंत आपणास कळत नाही तोपर्यंत ईश्वराचे खरे स्वरूप आपणास कळणार नाही. उच्च जाती, नीच जाती ही ईश्वरकृत नाही. दुसऱ्या माणसास अस्पृश्य मानणे हे मनुष्यत्वाचे लक्षण नाही.'

स्त्रियांची सर्वांगीण सुधारणा व्हावी या हेतूने जोतीरावांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाईंनी 'महिला सेवा मंडळाची' स्थापना केली. या संस्थेतर्फे तीळगूळ समारंभासारखे कार्यक्रम साजरे केले जात. हे कार्यक्रम सार्वजनिक स्तरावर साजरे होत आणि त्यात सर्व जातीधर्माच्या स्त्रियांना मुक्तद्वार असे. कोणत्याही प्रकारे जातीभेद अथवा पक्षपात न करता सर्व स्त्रियांना समानत्वाने वागवले जाई.

याच काळात जोतीरावांनी सावित्रीबाईंच्या सहकार्याने 'बालहत्या प्रतिबंधक गृह' ही काढले होते. तेथे केवळ परोपकार बुध्दीने कुठल्याही जातीधर्माच्या विधवेला प्रवेश दिला जात होता. तसेच त्या काळात पडलेल्या दोन मोठ्या दुष्काळात सावित्रीबाईंनी अन्नछत्र काढून त्यात दुष्काळग्रस्तांची आत्मियतेने काळजी घेतली. १८९७ च्या प्लेगच्या साथीत घरोघरी जाऊन सावित्रीबाईंनी प्लेगग्रस्तांची शुश्रुषा केली.

सावित्रीबाईंना वाचनाचीही आवड होती. त्यांचा स्वतःचा पुस्तक संग्रह होता. त्यात 'श्रीग्रह लाघव', 'म्हणींविषयी चार शब्द', 'नीतिशतक', 'शुकबहात्तरी', 'हिंदुस्थानचा इतिहास', 'भूगोल पत्रक', 'सॉक्रेतिसचे चरित्र', 'अंकगणित प्रथम भाग - पूर्णांक' आदी पुस्तके होती.

सावित्रीबाई या जशा सामाजिक कार्यकर्त्या होत्या. त्याचप्रमाणे त्या एक उत्तम दर्जाच्या कवयित्री होत्या. त्यांच्या काव्यात निसर्ग, जोतीराव आणि त्यांच्या कार्यावर असणारे नितांत प्रेम, दीन दलितांबद्दल कळवळा, स्त्रियांच्या उन्नतीसाठी तळमळ मानवतेच्या उपासकाची भूमिका आदी पैलू प्रकर्षाने जाणवतात.

**माझ्या जीवनात जोतिबा स्वानंद**
**जैसा मकरंद कळीतला ।।**

या ओळीतून सावित्रीबाई आपल्या जीवनातले जोतीरावांचे अनन्यसाधारण स्थान व्यक्त करतात तर,

**मनुष्यत्वप्राप्तीसाठी मार्ग स्वीकारा विद्येचा**
**बुध्दिसंपन्न होई तू हो मानवप्राणी सच्चा**

असा आपल्या आणि सर्व मनुष्यजातीच्याच जीवनाचा उद्देश सावित्रीबाई आपल्या काव्यातून मांडतात.

मानवतेच्या महान उपासिका असणाऱ्या सावित्रीबाईंना शत शत नमन.

**दहावी व बारावीच्या सर्व परीक्षार्थींना शुभेच्छा !**

दि. २८ जानेवारी २०२६
लाला लजपतराय जयंती

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्य : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### वार्षिक स्नेह संमेलन

मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी टिळक स्मारक मंदिर येथे संध्याकाळी ५ ते ८ या वेळेत वार्षिक स्नेह संमेलन सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध लेखिका व कवयित्री डॉ. संगीता बर्वे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते सर्व प्रथम पारितोषिक विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. या वेळी संस्थेचे पदाधिकारी आणि संचालक उपस्थित होते. विद्यार्थी प्रतिनिधी कु. अबीर हांडे याने केलेल्या भाषणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्या नंतर शिशु गट, छोटा गट व मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी विविध गुण दर्शन सादर केले.

## प्राथमिक विभाग

### वार्षिक स्नेहसंमेलन

बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी प्राथमिक विभाग व इयत्ता ५ वी आणि ६ वी यांचे वार्षिक स्नेहसंमेलन टिळक स्मारक मंदिर येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास सुप्रसिद्ध अभिनेत्री सुरभी हांडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. रमेश कुलकर्णी आणि श्री. आनंद कुलकर्णी उपस्थित होते. तसेच पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला व सौ. कोमल कुलकर्णी आणि शाळेच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. ललिता महाजन व इतर मान्यवर उपस्थित होते. प्राथमिक विभागाची विद्यार्थी प्रतिनिधी कु. स्तुती तेली हिने उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. प्राथमिक विभागाच्या शिक्षिका सौ. नेहा खोपकर यांना 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सुरभी हांडे यांनी विद्यार्थ्यांशी व उपस्थित पालकांशी सुसंवाद साधला. या स्नेहसंमेलनात इ. १ली ते ६वीच्या विद्यार्थ्यांनी बहारदार विविध गुणदर्शन सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## माध्यमिक विभाग व उच्च माध्यमिक विभाग

### English Extempore Competition

दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी English Extempore Competition घेण्यात आली. या स्पर्धेचे निकाल पुढीलप्रमाणे -

**लहान गट : (इ. ७ वी आणि ८ वी )**

| विद्यार्थ्यांचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. देवांशी वाघ | ७ वी इ | प्रथम |
| कु. आदिती रेणुसे | ७ वी ड | द्वितीय |
| कु. संस्कृती दौंड | ७ वी ड | तृतीय |

**मोठा गट : ( इ ९ वी आणि १० वी )**

| | | |
|---|---|---|
| कु. नंदिनी सागडे | ९ वी ब | प्रथम |
| कु. लुब्धा काळे | ९ वी ब | द्वितीय |
| कु. सिद्धी सोन्ने | १० वी अ | तृतीय |

या स्पर्धेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिका सौ. प्रचिती परांजपे परीक्षक म्हणून लाभल्या होत्या.

### मनाचे श्लोक पठण व वत्कृत्त्व स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृह अंतर्गत श्रीमती सरला वसंत सोंडूर मनाचे श्लोक पठण व वत्कृत्त्व स्पर्धा दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशालेमध्ये संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये इ. ७ ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रशालेच्या उच्च माध्यमिक विभागाच्या शिक्षिका डॉ. मनीषा कोतवाल यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. नंदिनी सागडे | ९ वी ब | प्रथम |
| कु. तन्मय इनामदार | ८ वी ब | द्वितीय |
| कु. जिज्ञासा डांगे | १० वी ब | तृतीय |

**वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ**

दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या जल्लोषात टिळक स्मारक मंदिर येथे पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी कलेक्टर, जिल्हा दंडाधिकारी मा. श्री. आशुतोष कुलकर्णी, रायगडा, ओरिसा आणि त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. सौ. नेहा कुलकर्णी उपस्थित होत्या. तसेच उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर आणि श्री. आनंद कुलकर्णी, प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, सर्व विभागाचे शिक्षक प्रतिनिधी, विद्यार्थी प्रतिनिधी, सर्व शिक्षक आणि कर्मचारी वर्ग, निमंत्रित, देणगीदार आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात माध्यमिक विभागाच्या गायन समूह विद्यार्थ्यांच्या शारदास्तवनाने झाली. प्राचार्य सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पर्यवेक्षिका सौ. विजया काळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी प्रमुख पाहुणे श्री. आशुतोष कुलकर्णी यांचे स्वागत केले. श्री. आशुतोष कुलकर्णी आणि डॉ. नेहा कुलकर्णी यांच्या हस्ते सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी उच्च माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. अंजली जोशी आणि माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. तन्मया सहस्रबुद्धे यांना यावर्षीचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देण्यात आला. पालकांनी आपल्या मुलांच्या क्षमता ओळखून त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे करिअर निवडू द्यावे आणि त्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्यावे असे मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले.

यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांनी 'Rhythm beyond borders' मध्ये विविध नृत्य प्रकारांचे सादरीकरण केले. इ. ८ वीच्या 'नाट्यरंग' या नाटिकेद्वारे मराठी नाट्यभूमीवरील विविध कलाकारांचे महत्त्व सांगितले. इ. ९वीच्या विद्यार्थ्यांनी 'छावा'या नाटिकेद्वारे छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन साकारले. इ. १० वीच्या विद्यार्थ्यांनी 'अखंड भारत' चे उत्कृष्ट सादरीकरण केले. उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'नवरस आणि भाव' यावर नृत्यनाटिका सादर केली. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम्‌ने'झाली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आणि मुग्ध करणाऱ्या सादरीकरणाला पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

***




*** मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ***

**जीटीजीएफ तायक्वांदो स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचा चषक स्वीकारताना शाळेच्या प्राथमिक विभागाचे विद्यार्थी**

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्र. प्राचार्य : डॉ. ज्ञानेश्वर दाते**

## सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन

शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आरंभी प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, बी. एड. छात्र अध्यापक यांनीही सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून वंदन केले. यानंतर ईशस्तवन सादर करण्यात आले. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या महान कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमास इ. ५ वी ते १० चे विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. एड. छात्र अध्यापक श्री. महेश घाटगे यांनी केले. फलकलेखन प्रशालेचे अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. बी. एड. छात्र अध्यापक श्री. गोकुळ भरत भगरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## वार्षिक स्नेहसंमेलन

दि. २ ते १३ डिसेंबर २०२५ या कालावधीत क्रीडास्पर्धा व बौध्दिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये प्रशालेतील इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी प्रशालेतील विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ रोजी टिळक स्मारक मंदिर येथे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे सराफ असोसिएशनचे अध्यक्ष मा. श्री. फत्तेचंद रांका उपस्थित होते. श्री. फत्तेचंद रांका यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि श्री सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि दीप प्रज्वलनही करण्यात आले. तसेच या प्रसंगी उपस्थित असलेले संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर आणि श्री. रमेश कुलकर्णी, प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते, कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. मल्लिनाथ वाघमोडे, माध्यमिक विभागाच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. सविता जगताप, माध्यमिक विभागाचे शिक्षकेतर प्रतिनिधी श्री. ललित खंडाळे यांनीही प्रतिमा पूजन केले. यानंतर ईशस्तवन सादर करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्री. फत्तेचंद रांका यांचा सत्कार संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन केला. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर आणि श्री. रमेश कुलकर्णी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी केला. कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. मल्लिनाथ वाघमोडे, माध्यमिक विभागाच्या शिक्षक प्रतिनिधी सौ. सविता जगताप, माध्यमिक विभागाचे शिक्षकेतर प्रतिनिधी श्री. ललित खंडाळे, विद्यार्थी प्रतिनिधी कु. वेदांत कोकितकर, कु. आर्या गुप्ते यांचा प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांचा सत्कार संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी केला.

मा. श्री. फत्तेचंद रांका यांच्या हस्ते आश्रमस्थ विद्यार्थी चि. जयेश दौंडकर यास अष्टपैलू विद्यार्थी म्हणून मानाची भागवत ढाल प्रदान करण्यात आली. क्रीडा स्पर्धा व बौध्दिक स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. माध्यमिक विभागाच्या

अध्यापिका सौ. सुनंदा भाईक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. रूपाली चौथाई यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुणे मा. श्री. फत्तेचंद रांका यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे व सौ. प्राजक्ता चोपडे तसेच कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. अपर्णा भरगुडे यांनी गुणवत्ता यादीवाचन केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. नीलिमा घोरपडे यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी केले. यानंतर इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानंतर्गत शाळा तपासणी

शनिवार दि. १० जानेवारी २०२६ रोजी पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक  शाळा, व मुख्याध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने पूना नाईट स्कूलचे मुख्याध्यापक मा. श्री. सतीश वाघमारे, सेंट हिल्डाज स्कूलच्या मुख्याध्यापिका मा. सौ. अपर्णा जाधव, नू. म. वि. (मुलांची) प्रशालेचे अध्यापक मा. श्री. निलेश साबणे, गिरमे हायस्कूलचे अध्यापक श्री. निलेश चौदार, दादा गुजर, माध्यमिक विद्यालय मोहम्मद वाडी येथील लिपीक श्री. मुस्ताक सय्यद तसेच तपासणी पथकातील सर्व सन्माननीय सदस्य या सर्व शालेय तपासणी समिती पथकाने प्रशालेची तपासणी केली. या सर्व पथकाचे प्रशालेतील एन. सी. सी. छात्रांनी ढोल ताशांच्या गजरात मार्चिंग करत प्रथम स्वागत केले. या पथकाने भौतिक सुविधा तपासणी, प्रशासनविषयक, शैक्षणिक अध्ययन अध्यापन प्रक्रिया विषयक, शालेय विभाग विषयक, गुणवत्ता संवर्धन विषयक, विशेष उपक्रम विषयक अशा एकूण ६ विभागांच्या फाईल्सची तपासणी करून तालुकास्तरीय गुणांकन केले. या प्रसंगी या समितीतील सर्व सदस्यांनी प्रशालेतील ऑफिस तपासणी, एन. सी. सी. रूम तपासणी, फिजिक्स लॅब, केमिस्ट्री लॅब, बायोलॉजी लॅब, ई लर्निंग रूम, इंदुमती वाचनालय या सर्व ठिकाणी भेट देऊन तपासणी केली. शाळा तपासणीनंतर या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रशालेतील सर्व शिक्षकांची सभा घेतली. या सभेचे प्रास्ताविक प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. शाळा तपासणीस आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी सत्कार केला.

पूना नाईट स्कूलचे मुख्याध्यापक मा. श्री. सतीश वाघमारे, सेंट हिल्डाज स्कूलच्या मुख्याध्यापिका मा. सौ. अपर्णा जाधव, नू. म. वि. (मुलांची) प्रशालेचे अध्यापक मा. श्री. निलेश साबणे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी केले. फलकलेखन बी. एड. छात्र अध्यापक श्री. गोकुळ भगरे यांनी केले. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती, राष्ट्रीय युवा दिन उत्साहात संपन्न

सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा आरंभ प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि स्वामी विवेकानंद यांच्या कार्याबद्दल माहितीही अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी दिली. प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या कार्याबद्दल माहिती विद्यार्थ्यांना दिली. या कार्यक्रमास प्रशालेतील इ. ५ वी ते १० वी चे विद्यार्थी, सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे डिजिटल फलकलेखन बी. एड्. छात्र अध्यापक श्री. गोकुळ भगरे यांनी केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. ***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**
**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा नाईक (माध्यमिक)**

## पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

### वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण

दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे रिटायर्ड एअर मार्शल श्री. अरुण गरुड हे होते. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी व संचालक उपस्थित होते.

मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यार्थ्यांना सैन्य दलात भरती होणे आणि देशाची सेवा करणे हे किती अभिमानास्पद आहे हे पाहुण्यांनी आपल्या भाषणातून सांगितले आणि पालकांना सैन्य दलातील संधी याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शाळेचा मागील वर्षाचा प्रगतीचा आढावा पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून पालकांच्या समोर मांडण्यात आला. याचे सादरीकरण सौ. नीता गर्ग यांनी केले. सौ. निकिता कदम, कु. श्रेया भोसले, आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. अश्विनी धांदल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विद्यार्थी प्रतिनिधी कु. मंजिरी माळी हिने आपले विचार पालकांसमोर मांडले.

'मदर अर्थ' या विषयावर विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. आभार प्रदर्शन सौ. वीणा मुसळे यांनी केले.

## माध्यमिक विभाग

### वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण

दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन टिळक स्मारक मंदिर येथे पार पडले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे उपजिल्हाधिकारी श्री. हर्षद घुले, तसेच संस्थेचे पदाधिकारी व संचालक, प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख चंद्रकला शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी कु. वेदांत वाडेकर आणि कु. सोनाक्षी पायगुडे उपस्थित होते.

मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पालक विद्यार्थ्यांना मागील शैक्षणिक वर्षातील शाळेची प्रगती व विविध क्षेत्रात मिळालेल्या बक्षिसांच्या संदर्भातील माहिती पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे सौ. शिल्पा बिराडे व स्वरूपा मोरे यांनी सादर केली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

'देशभक्ती एक अभिमान' या विषयावर विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सोनाली शिंदे आणि सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांनी केले.

### वार्षिक सहल

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी इ. ९वी व १०वी या वर्गांची वार्षिक सहल बनेश्वर कृषी पर्यटन केंद्र, बनेश्वर येथे गेली होती. विद्यार्थ्यांना निसर्गाशी जोडण्यासाठी व शेतीतील विविध गोष्टींची माहिती मिळण्यासाठी मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी सहलीचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांसाठी विविध साहसी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर शेतीतील विविध कामांची माहिती विद्यार्थ्यांना आयोजकांतर्फे देण्यात आली. बैलगाडीतून फिरणे, ट्रॅक्टरवरून फिरणे तसेच विविध खेळांचा आणि रानमेव्याचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला.

### क्रीडा दिन उत्साहात संपन्न

दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्राचे माजी मॅनेजर मा. श्री. अरविंद पटवर्धन हे उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रमुख पाहुण्यांनी खेळाचे जीवनातील महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कु. आदिती कार्लेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे आयोजन क्रीडा शिक्षिका सौ. चंद्रकला शिंदे व क्रीडा शिक्षक श्री. विशाल गावकर यांनी केले होते. प्रमुख पाहुणे व मुख्याध्यापिका यांच्या हस्ते खेळातील आदर्श आणि एकतेची प्रतीक असलेली मशाल पेटवली गेली. शाळेतील विविध गटातील विद्यार्थ्यांच्या हस्ते मशाल आणली गेली. या प्रसंगी खेळांच्या स्पर्धांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना, संघांना व मार्गदर्शक शिक्षकांना विविध पारितोषिके देऊन गौरवण्यात आले.

### राष्ट्रीय पोलिस सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

दि. ६ जानेवारी २०२६ रोजी प्रशालेमध्ये विश्रामबाग पोलीस ठाण्यातील पोलिसांनी राष्ट्रीय पोलीस सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या प्रसंगी विश्रामबाग पोलीस ठाण्यातील पोलीस उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक काळातील धोके, सायबर क्राईम किंवा विद्यार्थी दशेतील गुन्हेगारी याविषयी मार्गदर्शन केले. या सगळ्या गोष्टींपासून कसे दूर राहायचे आणि त्यांना कोणत्या प्रकारे पोलिसांची मदत मिळू शकते याविषयी मार्गदर्शन केले.

### इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनर व्याख्यानाचे आयोजन

इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्याते एअर मार्शल श्री. रमेश गरुड यांचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे, अत्यंत अवघड परिस्थितीत अभ्यासावर आणि मानसिक आरोग्यावर कशा पद्धतीने काम करणे गरजेचे आहे, त्याचबरोबर कमी वेळात जास्तीत जास्त अभ्यास कसा करावा, अभ्यास करण्याच्या सोप्या क्लुप्त्या त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितल्या. त्याचबरोबर प्रश्न उत्तर स्वरूपात गणित व विज्ञानातील अनेक संकल्पना त्यांनी विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका स्वरूपा मोरे यांनी केले. इ. १०वीच्या गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षिका आणि सर्व विद्यार्थी या व्याख्यानासाठी हजर होते. मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

### ७७ वा प्रजासत्ताक दिन

सोमवार दि. २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचे अध्यक्ष, पीएचडी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, ३४ वर्षांचे शिक्षण खात्यातील अनुभवी व्यक्तिमत्त्व डॉ. प्रशांत साठे हे होते. डॉ. प्रशांत साठे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत झाले. यानंतर महाराष्ट्र विद्यालयाच्या एनसीसी छात्रांनी आणि मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखा पुणे प्रशालेच्या स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांनी मार्च पास्ट करून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. याप्रसंगी महाराष्ट्र विद्यालयाचे अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांनी प्रशालेतील विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, यांच्याकडून ध्वजप्रतिज्ञा म्हणवून घेतली. यानंतर संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक मुक्तांगण इंग्लिश स्कूल सदाशिव पेठ शाखेच्या अध्यापिका सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांनी केले. उपस्थितांचे स्वागत आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी करून दिला. प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत साठे यांचा सत्कार संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन केला. तसेच संचालक श्री. रमेश कुलकर्णी, महाराष्ट्र विद्यालय आणि कनिष्ठ

महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते, महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे प्र. प्राचार्य परमेश्वर शिंदे, मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे, शिशु निकेतन मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे, प्रशालेचे निवृत्त अध्यापक श्री. भागवत शेलार, नेरूळ शाखेचे माजी मुख्याध्यापक श्री. भीमराव अडसूळ यांचाही सत्कार संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी गुलाबपुष्प देऊन केला. मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक यांनी संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. यानंतर प्रमुख पाहुणे श्री. प्रशांत साठे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रशालेतील इ. ७वीच्या विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. तसेच इ. ८वी, ९वी आणि १०वीच्या विद्यार्थ्यांनी पिरॅमिड सादर केले. शासनाने सांगितलेल्या उपक्रमांतर्गत प्रशालेतील विद्यार्थ्यांकडून सामूहिक कवायत करून घेण्यात आली. तसेच असाक्षर मुक्त गावाची शपथ अध्यापिका सौ. प्राजक्ता मुरमुट्टी यांनी विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेतली. उपस्थितांचे आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. प्राजक्ता मुरमट्टी यांनी केले. फलकलेखन महाराष्ट्र विद्यालयाचे अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. या कार्यक्रमास संस्थेच्या विविध विभागातील कर्मचारी प्रशालेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी, पालक, देणगीदार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाची सांगता वंदेमातरम या राष्ट्रीय गीताने करण्यात आली. यानंतर प्रशालेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. ***

# शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

### तुळशी पूजन

दि. २ डिसेंबर २०२५ रोजी शाळेमध्ये तुळशी पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिंदू धर्मात तुळशीला लक्ष्मीचे रूप मानले जाते. तसेच तुळशीच्या रोपामध्ये अनेक गुणकारी औषधांचे गुण असतात. कार्यक्रमाच्या शेवटी पवित्र अशा तुळशीच्या रोपांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

### संपूर्ण वंदे मातरम गायन

दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी शाळेमध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या 'वंदे मातरम्' या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी 'संपूर्ण वंदे मातरम्' या गीताचे गायन केले.

### शैक्षणिक सहल

दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. पुणे परिसरातील ऐतिहासिक भुलेश्वर मंदिर, थेऊरचा गणपती, प्रयागराज धाम (महानुभव पंथाच्या महंताचे भव्य मंदिर), एम्प्रेस गार्डन या ठिकाणी विद्यार्थ्यांची सहल आयोजित करण्यात आली होती.

### आंतरशालेय रांगोळी स्पर्धेचे आयोजन

दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी आंतरशालेय रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक, आधुनिक पध्दतीने निसर्ग, सण - उत्सव अशा विविध विषयांवर रांगोळ्या काढल्या.

### चित्रकला स्पर्धेमध्ये सहभाग

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सराफ असोसिएशन तर्फे भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन सारसबाग येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये शाळेतील १०५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

### आनंदी बाजाराचे आयोजन

दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांना हिशोब व गणित समजण्यासाठी आनंदी बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पालकांनी घरी बनवून आणलेले खाद्यपदार्थ, फळे, भाजीपाला, कृत्रिम दागिने अशा विविध वस्तूंचे स्टॉल्स लावले होते. यावेळी विद्यार्थी आणि पालकांच्या सहकार्याने बाजारात प्रत्यक्ष खरेदी करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. ***

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट, पुणे ९

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**
**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**
**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## इ अ‍ॅण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

भिवराबाई सावंत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च वाघोली, पुणे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत 'कंट्रोल सिस्टीम' या विषयावर प्राध्यापकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. महेश पोतदार यांनी दि. ७ जानेवारी २०२६ रोजी 'कंट्रोल सिस्टीम' या विषयासाठी रिसोर्स पर्सन म्हणून काम केले. प्रा. महेश पोतदार व त्यांचे विद्यार्थी कु. पंकज रामावत व कु. गोकुळ कळवणे यांनी 'मायक्रो कंट्रोलर फ्री वायरलेस कंट्रोल फॉर होम अँड इंडस्ट्रियल ऑटोमेशन' या विषयावर एकत्रित काम केले. पेटंट ऑफिस, गव्हर्मेंट ऑफ इंडिया तर्फे त्यांना वरील विषयावर डिझाईन पेटंट प्राप्त झाले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवायोजना विभागातर्फे दि. २८ डिसेंबर २०२५ ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत भोर तालुक्यातील उंबरे गावात विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विविध शाखांतील ७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. यू. बी. सरोदे तसेच प्रा. ए. एस. नजन यांच्यासह ५ अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आणि लघु बंधारा (छोटे धरण) उभारणी, रस्त्यांची देखभाल अशा विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रकल्पांचे उच्च दर्जाच्या, प्रकाशित करण्यायोग्य संशोधनात रूपांतर करण्यासाठी आवश्यक साधने, नैतिक अधिष्ठाने व संरचनात्मक ज्ञान प्रदान करण्याच्या उद्देशाने ई अँड टीसी विभागाच्या R & D सेलने IIC व IEI यांच्या सहकार्याने From Project to Publication : Mastering Technical Paper Writing for Emerging Researchers या विषयावर एक सत्र आयोजित केले. हे सत्र प्रा. डॉ. मौसमी व्ही. मुनोत (सहप्राध्यापक, PICT, पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २१ जानेवारी २०२६ रोजी हायब्रिड पद्धतीने पार पडले. या कार्यक्रमास द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ३२० सहभागी उपस्थित होते.

दि. १९ जानेवारी २०२६ रोजी अंतिम वर्षाचे विद्यार्थी कु. निखिल घोडके, कु. रिषित गोखले व कु. वेदांत गोगावले यांनी प्रा. यू. ए. वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथे झालेल्या १०व्या आंतरराष्ट्रीय परिषद 'International Conference on Smart Trends in Computing and Communications' मध्ये आढावा संशोधन पत्र सादर केले.या पत्रात हवामान डेटाशी एकीकृत MPPT - आधारित सोलर चार्ज कंट्रोलरवर भर देऊन ऊर्जा कार्यक्षमता व एकूण प्रणाली कार्यक्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. तसेच, अलिकडील तांत्रिक प्रगतींचा अभ्यास करून बुद्धिमान, हवामान-संबंधित सौर ऊर्जा व्यवस्थापनासाठी एक संकल्पनात्मक मॉडेल सुचवले आहे. विद्यार्थी कु. सुशांत शिरीष जाधव, कु. संकेत अळसरे व कु. साहिल अळसरे यांनी प्रा. दीप्ती वरपे यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराष्ट्रीय परिषदेत आढावा (Review) संशोधन पेपर सादर केला.

अंतिम वर्षाचे विद्यार्थी कु. प्रज्वल शाहणे, कु. स्वप्निल पाटील व कु. उर्वी पाटील यांनी प्रा. यू. ए. वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली Dynamic Traffic Signal Operation या शीर्षकाचा संशोधन पेपर ९व्या International Conference on Information and Communication Technology for Intelligent Systems (ICTIS Thailand 2025) च्या कार्यवृत्तांत (Proceedings) प्रकाशित केला आहे. हा संशोधन

पेपर माहिती व संवाद तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे बुद्धिमान वाहतूक प्रणालींच्या (Intelligent Transportation Systems) विकासातील विद्यार्थ्यांचे योगदान अधोरेखित करतो.

विभागातील विद्यार्थ्यांनी, प्रा. डी. टी. वरपे यांच्या मार्गदर्शनाखाली 'Solar Powered Multipurpose Agricultural Robot' या शीर्षकाचा संशोधन पेपर ICT 4SD : Analysis and Applications या परिषदाच्या कार्यवृत्तांत (Proceedings) प्रकाशित केला आहे.

महाविद्यालयाचे संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांना Skilletz Foundation व MNVTI, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'निर्मिती अवॉर्ड्स २०२६' पुरस्कार वितरण समारंभासाठी दि. २० जानेवारी २०२६ रोजी मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. तसेच प्रा. प्रिया देशपांडे, प्रा. मीनल अपसंगी व प्रा. संगीता बावकर यांनी BizQueen Season ४ या महिला उद्योजकांसाठी आयोजित कार्यक्रमास दि. २१ जानेवारी २०२६ रोजी उपस्थिती लावली. हा कार्यक्रम Reduce–Reuse–Recycle या संकल्पनेवर आधारित असून महिला उद्योजकांना त्यांच्या उत्पादनांचे सादरीकरण करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ प्रदान करतो.

दि. १६ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथील के. जे. अभियांत्रिकी महाविद्यालय आणि व्यवस्थापन संशोधन येथे झालेल्या 'ऑब्जेक्ट-ओरिएंटेड प्रोग्रामिंग (२०२४ पॅटर्न) एनईपी २०२० अनुरूप अभ्यासक्रम रचना' या विषयावरील प्राध्यापकांच्या मार्गदर्शन कार्यशाळेत प्राध्यापक एन. डी. चौधरी आणि प्राध्यापक व्ही. व्ही. सोवनी सहभागी झाले.

द्वितीय वर्षाच्या (२०२४ पॅटर्न) च्या विविध विषयांवर एका दिवसाच्या एसपीपीयू फॅकल्टी ओरिएंटेशन वर्कशॉपमध्ये 'सिग्नल्स अँड सिस्टम्स' या विषयावर प्रा. दीप्ती वर्पे व प्रा. उषा वाळके यांच्या सत्राला उपस्थिती लावली, तर कम्युनिकेशन इंजिनिअरिंगमध्ये डॉ. एस. आर. लिटके व प्रा. ए. एस. नजन यांनी सहभाग घेतला, आणि कंट्रोल सिस्टम्समध्ये प्रा. ए. जे चौधरी व प्रा. व्ही. व्ही. सैदाने यांनी सहभाग घेतला.

## इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी इंजिनिअरिंग विभाग

डॉ. एस.ए. महाजन, प्रा. एन. एस. शिरसाट आणि प्रा. एस. जी. कांबळे यांनी महाविद्यालयाच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अ‍ॅण्ड डेटा सायन्स विभागातर्फे आयोजित 'आर्टिफिशियल इंटेलिजन्समधील संशोधनासाठी मॅथ-२ मॉडेल' या विषयावरील, आयएसटीई-मान्यताप्राप्त एक आठवड्याचा प्राध्यापक विकास कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. या कार्यक्रमाचा कालावधी दि. ५ ते ९ जानेवारी २०२६ होता.

### अभिनंदनीय

अंतिम वर्ष २०२५ चा विद्यार्थी कु. सुदेश शैलेश बनसोडे यांची 'एशिया टू जपान फाउंडेशन'च्या माध्यमातून दि. १४ ते १९ डिसेंबर २०२५ दरम्यान टोकियो येथील मुलाखतीसाठी निवड झाली होती. जपानमधील टोकियो येथे त्याची निहोन सेझुकी किग्यो (NSK), मित्सुबिशी सोकेन DCS आणि यानमार होल्डिंग्स कंपनी लिमिटेड या कंपन्यांमध्ये मुलाखती झाल्या. त्यांना यानमार होल्डिंग्स कंपनी लिमिटेडकडून नोकरीची ऑफर मिळाली आहे.

विभागाच्या अंतिमवर्षातील २० विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे आणि १७ पेक्षा जास्त विद्यार्थी विविध कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करत आहेत.

## इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

विभागप्रमुख डॉ. एम. एस. ठाकरे यांना अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष (IQAC), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी प्रमुख संशोधकांनी सादर केलेल्या ASPIRE संशोधन प्रकल्पांच्या मूल्यमापनासाठी तज्ज्ञ म्हणून कार्य करण्याचा सन्मान लाभला.

डॉ. मंगेश ठाकरे, डॉ. सुनील गायकवाड, डॉ. मंदार भवाळकर, प्रा. प्रीती खत्री, प्रा. उदय सरोदे, डॉ. उज्ज्वला ठकार, प्रा. राधा रांजेकर, प्रा. ओंकार पावसकर आणि प्रा. सुरेश यमला यांची BOS SPPU यांच्या तर्फे २०२४ पॅटर्नच्या विद्युत अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम तयार करण्याऱ्या समिती मध्ये निवड झाली आहे.

डॉ. उज्ज्वला ठकार यांनी दि. २० ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिंपरी, पुणे यांच्याकडून आयोजित Innovative Research Prospects in Electrical Systems Integrating Artificial Intelligence (AI) या एक आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभागी होऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

प्रा. प्रीती खत्री यांनी दि. १२ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत बंशल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, लखनौ येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाद्वारे आयोजित Renewable Horizons : Driving Sustainability & Climate Action Forward या ATAL मंजूर एक आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभागी होऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

प्रा. प्रीती खत्री, प्रा. आर. ए. रांजेकर आणि प्रा. एस. एच. यमला यांनी दि. ५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत महाविद्यालयातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स या विभागाद्वारे आयोजित Math2model for Research in AI या ISTE मंजूर एक आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभागी होऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

विभागप्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी दि. ५ ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत सर विश्वेश्वरय्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नाशिक येथे आयोजित 'ऊर्जा, शाश्वतता आणि हवामान बदल' या विषयावरील AICTE प्रायोजित एक आठवड्याच्या ATAL फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला.

डॉ. मं. प. भवाळकर आणि प्रा. सुरेश यमला यांनी दि. २१ ते २६ डिसेंबर २०२५ या कालावधीत आदित्य विद्यापीठाद्वारे आयोजित AI-Powered Optimization Strategies for Sustainable Electric and Fuel Cell Vehicles या ATAL फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम मध्ये सहभागी होऊन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

डॉ. एम. एस. ठाकरे यांनी दि. २० ते २८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे यांच्या सहकार्याने UGC-MMTTC, जय नारायण व्यास (JNV) विद्यापीठ, जोधपूर, राजस्थान यांनी आयोजित केलेल्या, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय (MoE) अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) यांच्या मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (MM-TTP) अंतर्गत 'NEP -२०२० : ओरिएंटेशन व सेन्सिटायझेशन' या विषयावरील एक आठवड्याचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम A + श्रेणीसह यशस्वीरीत्या पूर्ण केला.

### एमबीए विभाग

एमबीए विभागात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत राष्ट्रीय मतदार दिन (दि. १४ जानेवारी २०२६) उत्साहात साजरे करण्यात आले. जानेवारी महिन्यात विभागाने लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबवून आपली सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मतदानाचे महत्त्व, नागरिक म्हणून असलेली जबाबदारी तसेच लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची जाणीव निर्माण करण्यात आली. अशा उपक्रमांच्या माध्यमातून विभाग लोकशाही मूल्यांची जपणूक करण्यासाठी सतत हिरीरिने व सक्रियपणे कार्य करत असून, जबाबदार व जागरूक नागरिक घडविण्याचा प्रयत्न करीत आहे.

**स्पोर्ट्‌स विभाग**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय ट्रॅक सायकलिंग क्रीडास्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाने दि. ५ जानेवारी २०२६ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या समन्वयाने आंतर ट्रॅक सायकलिंग क्रीडास्पर्धेचे आयोजन केले. सदर स्पर्धेमध्ये पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातून एकूण ४ मुले आणि ३ मुलींच्या संघांतील एकूण २९ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. सायकलिंग ट्रॅक इव्हेंट मधील वैयक्तिक ट्रायल आणि वैयक्तिक परस्यूट प्रकारची स्पर्धा आणि अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड चाचणी घेण्यात आली. स्पर्धेसाठी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या सौ. दिपाली शिळदनकर, श्री. दर्शन बारगुजे, श्री. सुनील प्रसाद हे पंच म्हणून उपस्थित होते. पुणे विद्यापीठ निवड समितीच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा लोणारी (एच. आर. एम. कॉलेज, राजगुरुनगर), सदस्य डॉ. दीपक शेंडकर (मोद्रण कॉलेज, गणेशखिंड), डॉ. लहानू जाधव (हिरे कॉलेज मालेगाव) आणि सौ. दिपाली पाटील (क्रीडाप्रबोधिनी प्रशिक्षक, बालेवाडी) हे उपस्थित होते. स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी संचालक श्री. सुनील रेडेकर, पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके हे उपस्थित होते. या स्पर्धेसाठी संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सायकलिंग क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी, आयोजन सचिव, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. नामदेव बन्ने यांनी काम पाहीले. ***

## कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

### स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २ जानेवारी २०२६ रोजी साजरे झाले. सांस्कृतिक कार्यक्रम व पारितोषिक वितरण समारंभ दि. ३ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या जल्लोषात पार पडला. महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दत्ता कोहिनकर (माईंड पॉवर ट्रेनर) उपस्थित होते. तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले. महाविद्यालयाच्या उपप्राचार्य रेखा जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

महाविद्यालयाचे प्रमुख व संस्थेचे संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्मिक शब्दात मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे डॉ. दत्ता कोहिनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, शिक्षक व पालक यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी आवर्जून उल्लेख केला. तसेच शिक्षक आणि पालकांप्रती कृतज्ञतेची भावना ठेवा, दररोज व्यायाम करा, आत्मविश्वास ठेवा, वेळेची कदर करा आणि अपयशाला घाबरू नका, कारण तीच यशाची पहिली पायरी आहे असा संदेश विद्यार्थ्यांना दिला.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी सहाय्यक प्राध्यापक वासुदेव वाघ (ॲनिमेशन डिपार्टमेंट) यांनी सुरेल बासरी वादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी विविध नृत्य व गायन सादर करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे नियोजन सहाय्यक प्राध्यापिका प्रियांका खुटवड यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका तेजल चोथे व सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल जाधव तर आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका ज्योती पाटील यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद उपस्थित होता. ***

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### नाताळ सण

बुधवार दि. २४.१२.२०२५ रोजी नाताळ सण साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थी सांताची टोपी घालून शाळेत आले होते. नाताळ पार्टीला आपले पालक श्री. संतोष पाटोळे यांनी सांताची भूमिका साकारून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. त्यांनी विद्यार्थ्यांना भेट वस्तूही दिल्या. सर्व विद्यार्थ्यांनी सांता बरोबर फोटो ही काढले. त्याच दिवशी शिक्षकांनी मुलांकडून ख्रिसमस ट्री बनवून घेतला. सर्व विद्यार्थ्यांना केक देण्यात आला. नाताळ आणि नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन ख्रिसमस साजरा करण्यात आला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया**

### नाताळ सण

दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी ख्रिसमस सण अत्यंत आनंदात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात शाळेच्या प्रांगणात सांताक्लॉजच्या भव्य प्रवेशाने झाली. विद्यार्थ्यांनी सांताक्लॉजसोबत आनंदाने खेळत, सजवलेल्या ख्रिसमस ट्रीभोवती नाचत उत्साहाने हा सण साजरा केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी स्वादिष्ट चॉकोबेक केकचा आनंद घेतला. शिक्षकांनी सर्वांना ख्रिसमस व येणाऱ्या नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### पालक सभा (विशेष मार्गदर्शनाची गरज असलेले विद्यार्थी)

दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी इ.१ली ते ४थी च्या विशेष मार्गदर्शनाची गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पालक सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत तसेच शाळेच्या समुपदेशिका यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी नियमित अभ्यास, गृहपाठ, वाचनाची सवय तसेच शाळा-पालक समन्वय यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.

समुपदेशकांनी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष मार्गदर्शन उपक्रमांची माहिती दिली. पालकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. या सत्रास पालकांचा सकारात्मक सहभाग लाभला. ही पालक सभा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी उपयुक्त ठरली.

### वार्षिक क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून प्राथमिक इंग्रजी विभागाचे PTA व SMC चे सन्माननीय सदस्य उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक करत खेळांचे महत्त्व, शिस्त, संघभावना व आरोग्यदायी जीवनशैली यावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडल व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व अभिमान स्पष्ट दिसत होता. सदर समारंभ मुख्याध्यापिका श्रीमती अनघा

सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी शिक्षकवृंदाच्या सहकार्याने यशस्वी झाली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढला. शेवटी उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद व पालकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**वर्ग सजावट उपक्रम**

दि. १ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मार्फत वर्ग सजावट हा उपक्रम यशस्वीपणे राबविला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वर्ग सजावटीसाठी विविध कल्पक साहित्यांचा वापर केला. रंगीत कागद, तक्ता, शैक्षणिक पोस्टर्स, चित्रे व संदेशफलक यांच्या सहाय्याने वर्ग अधिक आकर्षक, आनंददायी व अभ्यासासाठी अनुकूल बनविण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि सर्जनशीलता जाणवत होती.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सौंदर्यदृष्टी तसेच वर्गाबद्दलची आपुलकी निर्माण झाली. सर्व सहभागी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक करण्यात आले आणि उपक्रमाची यशस्वी सांगता झाली.

**तिसरी PTA / SMC सभा**

शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता तिसरी PTA / SMC सभा मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांच्या उपस्थितीत यशस्वीपणे संपन्न झाली. सदर सभेस पालक प्रतिनिधी, SMC सदस्य तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

सभेची सुरूवात उपस्थित सदस्यांच्या स्वागताने करण्यात आली. त्यानंतर खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली -

१. क्रीडा दिन : क्रीडा दिनाचे आयोजन, नियोजन व विद्यार्थ्यांच्या सहभागाबाबत चर्चा करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याचे आवाहन करण्यात आले.

२. द्वितीय फॉर्मेटिव्ह मूल्यमापन : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. मूल्यमापन पद्धती, पालकांची भूमिका व विद्यार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन यावर चर्चा झाली.

३. वार्षिक स्नेहसंमेलन : वार्षिक स्नेहसंमेलनाच्या तयारीबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमाची रूपरेषा, विद्यार्थ्यांचे सादरीकरण व आयोजनासंबंधी मुद्दे मांडण्यात आले.

४. सुवर्णमहोत्सव समारंभ : शाळेच्या सुवर्णमहोत्सवाच्या अनुषंगाने नियोजन व विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

५. पालक व शिक्षक अभिप्राय : शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यावर पालक व शिक्षकांनी आपले मौल्यवान अभिप्राय व सूचना मांडल्या.

सभा सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. उपस्थित सदस्यांनी शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले व भविष्यातही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शेवटी सर्व उस्थितांचे आभार मानून सभेची सांगता करण्यात आली.

**पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ हस्ताक्षर स्पर्धा २०२६**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ यांच्या वतीने आयोजित हस्ताक्षर स्पर्धा २०२६, विद्याभवन प्राथमिक इंग्रजी विभागात विविध इयत्तांसाठी यशस्वीपणे संपन्न झाली. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छ, सुंदर हस्ताक्षराची आवड निर्माण करणे तसेच भाषेप्रती गोडी वाढवणे हा होता. स्पर्धेत इयत्ता १ली ते ४थी मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर, मांडणी, अक्षरांची स्पष्टता व एकसंधता या निकषांवर परीक्षण करण्यात आले. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १ली | प्रथम | कु. निर्वी विशाल डुंबरे |
| | द्वितीय | कु. तितिक्षा हरेश कानडे |
| | तृतीय | कु. स्वरा मनोज कोठेरे |
| २ री | प्रथम | कु. श्रीशा संदीप बाबर |
| | द्वितीय | कु. दुर्वा अजय शिर्के |
| | तृतीय | कु. अनय प्रदीप खांडगे |
| ३री | प्रथम | कु. आराध्या परेश कदम |
| | द्वितीय | कु. सामवेद साईप्रसाद लाड |
| | तृतीय | कु. रिध्वी रवी लोहार |
| ४थी | प्रथम | कु. कैरवी कमलेश मोरे |
| | द्वितीय | कु. मनस्वी प्रशांत बालसराफ |
| | तृतीय | कु. स्वरा संतोष गायकवाड |

सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधारण्याची प्रेरणा मिळाली व मराठी लेखनातील कौशल्य विकसित होण्यास मदत झाली. शिक्षकवृंदाच्या मार्गदर्शनामुळे व विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

### आंतरवर्गीय कोलाज मेकिंग स्पर्धा

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी पृथ्वी हाऊसच्या वतीने आंतरवर्गीय कोलाज मेकिंग स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. या स्पर्धेत इ. १ली ते ४थी मधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयानुसार विविध साहित्याचा कल्पक वापर करून सुंदर कोलाज सादर केले. स्पर्धेचे परीक्षण सर्जनशीलता, स्वच्छता, विषयाशी सुसंगती व एकूण परिणाम या निकषांवर करण्यात आले. विजेते पुढीलप्रमाणे -

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव |
|---|---|---|
| १ ली | प्रथम | कु. रेणू निलेश जगदाळे |
| | द्वितीय | कु. कियारा सुशांत राळे |
| | तृतीय | कु. प्रिशा नितेश मोरे |
| २ री | प्रथम | कु. आराध्या सचिन गोराडे |
| | द्वितीय | कु. दिशा नरेश गुप्ता |
| | तृतीय | कु. अर्नी गौरव सावंत |
| ३री | प्रथम | कु. शामली संतोषकुमार वाघमारे |
| | द्वितीय | कु. अर्णव विकास धुमाळ |
| | तृतीय | कु. महिका संतोष क्षीरसागर |
| ४थी | प्रथम | कु. शिवन्या मंगेश डांगरे |
| | द्वितीय | कु. आरव गणपत रोडे |
| | तृतीय | कु. चिन्मय विजय गुप्ता |

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व आत्मविश्वास वाढीस लागला. सर्व विजेत्यांचे व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

### आंतरशालेय स्पर्धा

विद्यार्थ्यांमधील कलागुण, सर्जनशीलता, आत्मविश्वास, शिस्त व स्पर्धात्मक वृत्ती यांचा विकास व्हावा, तसेच विविध शाळांतील विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सादर करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने आंतरशालेय विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये चित्रकला, वक्तृत्व/पाठांतर, समूह गायन, नृत्य तसेच शिक्षकांसाठी सलाड मेकिंग स्पर्धा अशा विविध उपक्रमांचा समावेश होता. प्रत्येक स्पर्धा इयत्तानिहाय व वयोगटानुसार घेण्यात आली होती, ज्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळाली. स्पर्धांचे परीक्षण अनुभवी परीक्षकांमार्फत पारदर्शक पद्धतीने करण्यात आले. सादरीकरण, कल्पकता, आत्मविश्वास, तालबद्धता, विषयाशी सुसंगतता व एकूण प्रभाव या निकषांवर परीक्षकांनी निकाल जाहीर केले.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपले सुप्त गुण, कौशल्य व मेहनत यांचे प्रभावी दर्शन घडविले. शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेमुळेही शैक्षणिक वातावरणात आनंद, सृजनशीलता व सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. या आंतरशालेय स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला, संघभावना विकसित झाली आणि शिक्षणासोबतच सहशालेय

उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले. इयत्तानिहाय विजेते पुढीलप्रमाणे -

| इयत्ता | विद्यार्थ्यांचे नाव | स्पर्धा | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ली | कु. वरद विनायक गाडगे | चित्रकला | उत्तेजनार्थ |
| | कु. संचित देवानंद व्यास | वक्तृत्व / पाठांतर | उत्तेजनार्थ |
| २री | कु. अनन्या गणेश नाडार | चित्रकला | द्वितीय |
| ३री | कु. अर्णव विकास धुमाळ | चित्रकला | प्रथम |
| ४थी | कु. सान्ची सचिन हंबरे | चित्रकला | उत्तेजनार्थ |

**समूह गायन स्पर्धा : द्वितीय क्रमांक**

कु. निहारिका चंद्रकांत बाठे
कु. विहा विश्वास गाडे
कु. अविघ्न सचिन परब
कु. आराध्या परेश कदम
कु. शाल्मली संतोषकुमार वाघमारे
कु. हर्षदा प्रशांत जाधव

**नृत्य स्पर्धा : उत्तेजनार्थ**

कु. विहान पराग दीक्षित
कु. चैत्रा सचिन काज्रोलकर
कु. आराध्या धनंजय धुमाने
कु. निर्झरा सुधीर शेलार
कु. श्लोक गणेश चासकर
कु. आराध्या संतोष घाडगे
कु. एंजेल नंदू शेळके
कु. सई चंद्रकांत देसाई
कु. आर्यन सूर्यकांत जानकर
कु. शर्वरी तुकाराम पवार

**शिक्षकांसाठी स्पर्धा**

श्रीमती हरप्रीत कौर व्ही. जसवाल - सलाड मेकिंग - उत्तेजनार्थ

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे शाळेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे तसेच पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो.

**मेमरी टेस्ट स्पर्धा**

इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांसाठी स्मरणशक्ती, एकाग्रता व बौद्धिक क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने Inter-Class Memory Test Competition चे आयोजन करण्यात आले होते.

ही स्पर्धा अग्नी हाऊस यांच्या वतीने यशस्वीरीत्या घेण्यात आली. स्पर्धेची पहिली फेरी दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात आली, तर अंतिम फेरी दि. २ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. स्पर्धेचे मूल्यमापन जास्तीत जास्त बरोबर शब्द आठवणीत ठेवणे या निकषांवर करण्यात आले.

| इयत्ता | क्रमांक | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|---|
| १ली | प्रथम | कु. राजीव सुशील कांबळी |
| | द्वितीय | कु. अंशिका अशोक हाक्के |
| | तृतीय | कु. दिव्यांशी मनीष गुप्ता |
| २री | प्रथम | कु. अर्नी गौरव सावंत |
| | द्वितीय | कु. वेद विकास औटी |
| | तृतीय | कु. आराध्या सचिन गोर्डे |
| ३री | प्रथम | कु. दिया शिल्पन व्यास |
| | द्वितीय | कु. आराध्या परेश कदम |
| | द्वितीय | कु. मन्वा जयेश पाडेकर |
| | तृतीय | कु. कुशल योगेश घागवे |
| ४थी | प्रथम | कु. श्री जितेंद्र पाडीर |
| | द्वितीय | कु. कैरव कमलेश मोरे |
| | तृतीय | कु. तनिष्का तमिळगन नाडर |

या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व आपली स्मरणशक्ती व आत्मविश्वास यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

# विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्राचार्य : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या राज्य स्तरीय निबंध स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय घाटकोपर मधील इ. ५वी ते ८वी गटात व इ.९वी ते १२ वी गटात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेत घाटकोपर येथील विद्याभवन शाळेच्या कु. ईश्वरी श्रीधर एरंडे, इ. ७वी हिने उत्तेजनार्थ क्रमांक पटकविला. तसेच याच स्पर्धेत मोठ्या गटातून कु. तेजश्री ज्ञानेश्वर मोहन इ. ९वी हिनेही उत्तेजनार्थ क्रमांक पटकविला. दोन्ही विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन!

### गीता पाठांतर स्पर्धा

माजी विद्यार्थी मंडळ आयोजित गीता पाठांतर स्पर्धा विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी विविध शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष, इतर पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठी विभागाच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार आणि उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई तर इंग्रजी विभागाचे माजी मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील उपस्थित होते. गीता पाठांतर स्पर्धेत विजयी झालेले स्पर्धक पुढील प्रमाणेः

**गट क्र. ४ (मराठी)**

तृतीय क्रमांक : कु. संकेत संजय सरगर

**गट क्र. ५ (मराठी)**

द्वितीय क्रमांक : कु. संस्कृती संजय सरगर

तृतीय क्रमांक : कु. नीलाक्षी बजरंग दिघे

### सलाम बॉम्बे फाउंडेशन अंतर्गत चित्रकला स्पर्धा

दि. १५.१२.२०२५ रोजी सलाम बॉम्बे फाऊंडेशन अंतर्गत चित्रकला स्पर्धा विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये इ. ७ वी आणि ८वी च्या अ, ब, क तुकड्यांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्या कार्यकर्त्या श्रीमती मुक्ता पेडणेकर यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी Tobacco Free School हा विषय विद्यार्थ्यांना देण्यात आला होता.

### व्याख्यान इ. ९वी

सोमवार दि. १५.१२.२०२५ रोजी इ. ९वी/अ च्या विद्यार्थ्यांसाठी इतिहास संकलन समितीचे घाटकोपर येथील कार्यकर्ते श्री. शरद बोंडाळे यांचे 'भारताचा इतिहास संशोधन व नवीन गोष्टीची माहिती' या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रथम त्यांनी भारताचा नकाशा, प्राकृतिक रचना, हिमालयपर्वत, नर्मदा, सरस्वती नदी यांची माहिती दिली. त्याचबरोबर दिल्ली कुतुबमिनार, हिमालय रचना, पर्वतरांगा (अंदमान निकोबारपर्यंत) त्यांचा इतिहासाची शास्त्रीय दृष्टिकोनातून माहिती दिली. जुन्या वास्तू त्यात झालेले बदल यांची देखील माहिती दिली. सहा. शिक्षक श्री. देशमुख यांनी व्याख्याते श्री. शरद बोंडाळे यांचे आभार मानले.

### वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबीर

बुधवार दि. १७.१२.२०२५ रोजी विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे अप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या शिबिरासाठी तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते. त्यामध्ये डॉ. मनस्वी चव्हाण (बी.डी.एस.), डॉ. भरत सूर्यवंशी (जनरल फिजिशियन) व डॉ. नूतन राठोड (बी.डी.एस.) हे डॉक्टर्स उपस्थित होते. यांनी

इ. ५वी अ, ब, क च्या सर्व विद्यार्थ्यांचे दात, डोळे व इतर आरोग्य विषयक तपासण्या केल्या. विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. उपचार सांगितले.

### लिपन आर्ट- नावीन्यपूर्ण उपक्रम

शनिवार दि. २०.१२.२०२५ रोजी इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी लिपन आर्ट हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी Fridge Magnet, Lippan Art Rangoli तसेच Name Plate अशा विविध वस्तू क्लेचा व विविध रंगांचा वापर करून बनवल्या. या सर्व वस्तू मुलांनी खूपच सुंदर व आकर्षक बनवल्या होत्या. अतिशय सुंदर आणि नाविन्यतापूर्ण असा उपक्रम घेण्यात आला. श्री. अर्जुन मस्के यांनी या उपक्रमाचे नियोजन, आयोजन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या लिपन आर्ट वस्तूंचे प्रशालेतील अप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये प्रदर्शन भरवण्यात आले. हे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले होते.

### SPC पालक शिक्षक सभा

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी शाळेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात पोलीस कॅडेट म्हणून ज्या विद्यार्थ्यांची निवड झाली त्यांच्या पालकांची पालक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत पोलीस विभागाचे वरिष्ठ पोलीस अधिकारी मान. श्री. संजय पवार साहेब, श्री. खाडे साहेब तसेच त्यांचा कर्मचारीवर्ग व शिवाजी टेक्निकल इन्स्टिट्यूटचे मुख्याध्यापक श्री. भारमळ, मराठी माध्यमाच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, इंग्रजी माध्यमाच्या प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार, एस. पी. सी. कॅडेटचे विद्यार्थी व सर्व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी टेक्निकल स्कूलचे मुख्याध्यापक श्री. भारमळ यांनी केले. उपस्थित सर्व पालकांना पालक सभेच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. SPC हा उपक्रम संपूर्ण देशभर राबविला जात असून, संपूर्ण एन वॉर्ड मधून विद्याभवन हायस्कूल आणि शिवाजी टेक्निकल स्कूल या दोन शाळांची निवड करण्यात आलेली आहे. माननीय श्री. संजय पवार साहेब यांनी संपूर्ण मुंबई मधील ४४ शाळांमधून दहा हजार विद्यार्थी SPC साठी दत्तक घेण्यात आल्याची माहिती दिली. त्यापैकी एन वॉर्ड मधील आपल्या २ शाळांमधील विद्यार्थ्यांची निवड झाल्याचे सांगितले.

SPC कॅडेटचे विद्यार्थी दि. २६ जानेवारी २०२६ रोजी शिवाजी पार्कमध्ये होणाऱ्या संचलनामध्ये सहभागी होतील, ही गोष्ट आपल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी पालकांसाठी व शाळेसाठी अतिशय अभिमानाची आहे. त्यासाठी त्या विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्याचे काम पोलीस विभागामार्फत केले जात असल्याचे सांगितले. तरी सर्व पालकांनी आपल्या पाल्याच्या तयारीसाठी सहकार्य करावे. त्यांच्या आरोग्याची व आहाराची काळजी घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

माननीय पोलीस अधिकारी श्री. खाडे साहेब यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### जागतिक ध्यान दिवस

शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सेमीइंग्रजी च्या इ. ९वी च्या सर्व विद्यार्थ्यांना 'पिरामिड स्पिरिचुअल सोसायटीज मूव्हमेंट' (PSSM) चे श्री. व सौ. खोत आणि त्यांचे सहकारी यांनी प्रशालेच्या सेमिनार हॉलमध्ये 'जागतिक ध्यान दिवस' (२१ डिसेंबर) निमित्त 'ध्यान' या विषयावर मौलिक मार्गदर्शन केले. ध्यानाचे आजच्या काळातील महत्त्व छान पद्धतीने व्याख्यान स्वरूपात मुलांशी हितगुज साधत सांगितले. ध्यान का महत्त्वाचे आहे? ध्यान कसे करावे? त्याच्या योग्य पद्धती कोणत्या? याविषयी मागदर्शन केले.

सौ. खोत यांनी मुलांकडून व शिक्षकांकडून १० मि. चे एक प्रात्याक्षिक करून घेतले. 'ध्यान' या विषयावरील माहिती पत्रके सर्व मुलांना देण्यात आली. मान्यवरांचे आभार प्रशालेच्या उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी मानले. कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला.

## कुलगुरू दादासाहेब केतकर आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा

शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे संस्थेचे संस्थापक कुलगुरू दादासाहेब केतकर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा सकाळी ११.३० वाजता प्रशालेमध्ये आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेचे उद्‌घाटन कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाच्या प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती लता नायर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत १८ विद्यार्थी सहभागी होते. या स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणेः

१. पुस्तक माझा जिवलग मित्र
२. स्वच्छ भारत- स्वस्थ भारत
३. मोबाईल गेम/ शिक्षणाचा अडथळा का नवा मार्ग

या वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. सुभाष म्हात्रे आणि श्री. नाना पाटील यांनी काम पाहिले. आनंदाची बातमी म्हणजे या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी कु. आसावरी अमोल पाटील इ.८वी हिने प्रथम क्रमांक पटकावला.

## अभिनंदन वार्ता

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत 'राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२५-२६' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर मधील सहा. शिक्षक श्री. रूपेश नथुराम मांडवेकर यांनी वर्गात राबविलेला 'सन्मान प्रत्येक कामाचा', 'माझं काम माझा अभिमान' हे शीर्षक असलेला नवोपक्रम सादर केला होता.

विशेष म्हणजे त्यांनी सादर केलेल्या या नवोपक्रमाची मुंबई उपनगर जिल्ह्यातून प्रथम फेरीच्या ऑनलाईन मूल्यांकनात पहिल्या ७ सर्वोकृष्ट उपक्रमांमध्ये निवड झाली होती.

दि. २३.१२.२०२५ रोजी या स्पर्धेची द्वितीय फेरी विद्या प्राधिकरण, मुंबई येथे तज्ज्ञ परीक्षकांमार्फत घेण्यात आली. यामध्ये सर्वोत्कृष्ट ५ नवोपक्रमांची राज्यस्तरासाठी निवड करण्यात आली.

अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे यामध्ये श्री. रूपेश मांडवेकर यांच्या नवोपक्रमास चौथ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून त्यांची राज्यस्तरावर निवड झालेली आहे.

**श्री. रूपेश मांडवेकर यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## बालिका दिवस

शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन 'बालिका दिवस' म्हणून साजरा करण्यात आला.

इ. ७वी/ब च्या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट सादर केला. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनातील विविध प्रसंग सादर केले. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित गीत गायन सादर करण्यात आले.

या उपक्रमामध्ये इ. ७वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याचे नियोजन श्रीमती नंदिनी साके यांनी केले होते.

## माजी विद्यार्थी मंडळ आयोजित हस्ताक्षर स्पर्धा

सोमवार दि. ५ जानेवारी २०२६ रोजी विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मंडळ आयोजित 'हस्ताक्षर स्पर्धा' घेण्यात आली. ही स्पर्धा इ. ५वी ते ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत इयत्तेनुसार पुढील तीन विद्यार्थी पारितोषिक प्राप्त ठरलेः

**इयत्ता ५वी**

| **क्रमांक** | **विद्यार्थ्याचे नाव** | **इ/तु** |
|---|---|---|
| प्रथम | कु. तेजस मारुती सानप | ५वी/ब |
| द्वितीय | कु. समीक्षा संदीप सांगळे | ५वी/ब |
| तृतीय | कु. चैतन्य सुधीर सकपाळ | ५वी/क |

**इयत्ता ६वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. वेदिका संतोष खराडे | ६वी/ब |
| द्वितीय | कु. दर्शिता संजय सुतार | ६वी/क |
| तृतीय | कु. द्रुती सचिन परब | ६वी/अ |

**इयत्ता ७वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. संयुक्ता संतोष साळवे | ७वी/ब |
| द्वितीय | कु. ईश्वरी श्रीधर एरंडे | ७वी/क |
| तृतीय | कु. नीलाक्षी बजरंग दिघे | ७वी/ब |

**इयत्ता ८वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. आसावरी अमोल पाटील | ८वी/ब |
| द्वितीय | कु. वैष्णवी आप्पाराव केदार | ८वी/ब |
| तृतीय | कु. संस्कृती संजय सरगर | ८वी/ब |

### विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा २०२५-२६ (इ. ७वी / ८वी)

मंगळवार दि. ६ जानेवारी २०२६ रोजी प्रशालेच्या आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ.७वी व ८वी गटासाठी विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार आणि उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या स्पर्धेत प्रत्येक हाऊसचे ४ याप्रमाणे एकूण १६ विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची निवड प्रश्नमंजूषेच्या पहिल्या लेखी फेरीतून करण्यात आली होती. या लेखी फेरीमध्ये एकूण ६८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

या स्पर्धेसाठी श्रीमती मनीषा जायभाये, श्री. विजय पाटील व श्रीमती भारती धस्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धेचे यशस्वीरीत्या आयोजन केले. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी व हाऊस पुढीलप्रमाणेः

**प्रथम क्रमांक : वायू हाऊस**

| | |
|---|---|
| १. कु. अबोली दत्तात्रय राऊत | ७वी/अ |
| २. कु. निसर्गा कुमार साळी | ८वी/क |
| ३. कु. सान्वी राजेश सुर्वे | ८वी/क |
| ४. कु. जयदीप संदीप पाटील | ८वी/ब |

**द्वितीय क्रमांक : पृथ्वी हाऊस**

| | |
|---|---|
| १. कु. ध्रुव अनिल केदार | ८वी/अ |
| २. कु. प्रीतिका अमोल गोडसे | ७वी/क |
| ३. कु. कृपा अनिल केदार | ७वी/ब |
| ४. कु. रुद्र महेश महाडिक | ८वी/ब |

**तृतीय क्रमांकः अग्नी हाऊस**

| | |
|---|---|
| १. कु. नीलाक्षी बजरंग दिघे | ७वी/ब |
| २. कु. गार्गी सचिन गवळी | ७वी/अ |
| ३. कु. सोहम नितीन माने | ८वी/ब |
| ४. कु. अर्णव गोरक्ष नेहरे | ८वी/ब |

चार फेऱ्यांमध्ये घेण्यात आलेल्या या स्पर्धेत विजयी स्पर्धकांचे प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी अभिनंदन केले. श्रीमती मनीषा जायभाये यांनी उपस्थितांचे आभार मानून स्पर्धेची सांगता केली.

### विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा (इ. ५वी/६वी)

बुधवार दि. ७ जानेवारी २०२६ रोजी प्रशालेत इ. ५वी आणि ६वी या गटासाठी विज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा प्रशालेच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार आणि उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. या स्पर्धेत प्रत्येक हाऊसचे चार याप्रमाणे एकूण १६ विद्यार्थी सहभागी झाले होते. या सर्व विद्यार्थ्यांची निवड प्रश्नमंजूषेच्या पहिल्या लेखी फेरीतून करण्यात आली होती. या लेखी फेरीमध्ये एकूण चार गटांनी भाग घेतला होता. ही स्पर्धा श्रीमती रत्नप्रभा पाटील व श्रीमती पूजा पाटील यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेतील विजेते विद्यार्थी गट पुढीलप्रमाणे आहेत.

**प्रथम क्रमांक- वायू हाऊस**

| | |
|---|---|
| १. कु. मोक्ष प्रणिल सावंत | ६वी/क |
| २. कु. संकेत संजय सरगर | ६वी/क |
| ३. कु. काव्या समीर साळवी | ६वी/ब |
| ४. कु. अभय अविनाश पाटील | ५वी/ब |

**द्वितीय क्रमांक - पृथ्वी हाऊस**

| | |
|---|---|
| १. कु. विराज सतिश चिखले | ५वी/ब |
| २. कु. तेजस विजय साबळे | ६वी/अ |
| ३. कु. विराज राजेंद्र काळे | ६वी/अ |
| ४. कु. द्रुती सचिन परब | ६वी/अ |

चार फेऱ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेत विजेते ठरलेल्या या दोन हाऊसमधील विद्यार्थ्यांचे प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी हार्दिक अभिनंदन केले. श्रीमती रत्नप्रभा पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि स्पर्धेची सांगता झाली.

**एलीमेंट्री व इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा २०२५-२६ निकाल**

कला संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे घेण्यात येणाऱ्या एलीमेंट्री व इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा २०२५-२६ चा निकाल दि. ९ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला. विभागाचा एलीमेंट्री ग्रेड परीक्षेचा निकाल ९४.७३% तर इंटरमिजीएट ग्रेड परीक्षेचा निकाल ९६.०७% असा लागला. एलीमेंट्री परीक्षेला एकूण ३८ तर इंटरमिजीएट परीक्षेला एकूण ५१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यांनी पुढील प्रमाणे ग्रेड प्राप्त केली.

**एलीमेंट्री ग्रेड परीक्षा निकाल**

| | |
|---|---|
| अ ग्रेड | ०२ |
| ब ग्रेड | १० |
| क ग्रेड | २४ |

**इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा निकाल**

| | |
|---|---|
| अ ग्रेड | १५ |
| ब ग्रेड | २३ |
| क ग्रेड | ११ |

**डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा**

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे प्रतिवर्षी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेचे आयोजन करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये या स्पर्धेसाठी इ. ६वी चे ३५ व इ. ९वी चे ७ असे एकूण ४२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

दि. ८ नोव्हेंबर २०२५ रोजी या बालवैज्ञानिक स्पर्धेची लेखी परीक्षा घेण्यात आली. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. शिक्षिका श्रीमती मनीषा जायभाये व श्रीमती प्रज्ञा गावडे यांनी सर्व विद्यार्थ्यांची या स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करून घेतली व परीक्षेचे योग्य रीतीने आयोजन केले.

डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक लेखी परीक्षेत इ. ६वी व इ. ९वी च्या एकूण ११ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळाले. इ. ९वी मधील कु. आर्या अमोल हांडे या विद्यार्थिनीची पुढील प्रात्याक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती**

सोमवार दि. २ जानेवारी २०२६ रोजी प्रशालेत माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. इ. ५वी च्या अ, ब, क तुकडीतील विद्यार्थ्यांनी परीपाठामध्ये स्वामी विवेकानंद यांची माहिती सांगितली. तर माँ जिजाऊ यांच्यावर आधारित गाणे सादर केले.

मा. श्री. गिरीश जोशी यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व माँ जिजाऊ यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन इ. ५वी चे विद्यार्थी व वर्गशिक्षक यांनी केले.

***

# विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिकाः श्रीमती श्रीलता रमेश नायर**

## रोटरी क्लब ऑफ घाटकोपर आयोजित क्रिकेट स्पर्धा

रोटरी क्लब ऑफ घाटकोपर (पश्चिम) ने शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. घाटकोपर आणि विक्रोळी भागातील एकूण ३० शाळांनी या रोमांचक खेळात भाग घेतला. ज्यात उत्कृष्ट खिलाडूवृत्ती आणि संघभावना दिसून आली. या स्पर्धेत, विद्याभवन हायस्कूल नं. २ ने उत्कृष्ट कामगिरी केली आणि प्रभावी सामन्यांच्या मालिकेत दुसरे पारितोषिक मिळवले. संघातील खेळाडू खालीलप्रमाणेः

१. कु. सर्वेश नरवडे : कर्णधार
२. कु. सर्वेश मोरे : उपकर्णधार
३. कु. आयुष पवार
४. कु. जयदत्त घनदाट
५. कु. शौर्य डोके
६. कु. शुभम शिंदे
७. कु. प्रतिक चव्हाण
८. कु. शार्दुल विचारे
९. कु. अथर्व आंधळे
१०. कु. वीरेन भातुसे

या कार्यक्रमाने सांघिक कार्य, शिस्त आणि क्रीडापद्धतीवर प्रकाश टाकला, ज्यामुळे ही स्पर्धा सर्वांसाठी संस्मरणीय ठरली.

## इंटरस्कूल संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धा

शंकरालयम्, श्री हरिहरापूर भजन समाज, चेंबूर यांनी दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धेचे आयोजन केले होते. विद्याभवन हायस्कूल नं. २ मधून कु. अंजली अनिल भट (इ. ९वी/ब) हिने प्रथम पारितोषिक मिळवले आणि कु. यशिका मिलिंद पाटकर (इ. १०वी/अ) हिला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. दोघींनाही ट्रॉफी, प्रमाणपत्र, रोख रक्कम आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कु. कौस्तुभी संतोष नलावडे (इ. ७वी/अ) हिलादेखील तिच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल रोख रक्कम आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## करिअर आणि गणित मार्गदर्शन सत्र

इ. १०वी (सेमी-इंग्रजी) साठी गुरूवार दि. ०४ डिसेंबर २०२५ रोजी, करिअर नियोजन आणि गणित-भाग १ आणि भाग २ या विषयावर इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. श्री. प्रफुल देशमाने यांनी विद्यार्थ्यांना योग्य मानसिक संतुलन राखण्यासाठी आणि परीक्षेपूर्वी उर्वरित दिवसांमध्ये अभ्यासाचे नियोजन योग्य रीतीने पालन करण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर श्री. गव्हाणे यांनी बीजगणित आणि भूमितीमधील महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट करणारे दोन तासांचे तपशीलवार सत्र घेतले आणि विद्यार्थ्यांचे शंका निरसन केले. आगामी एसएससी परीक्षेसाठी शुभेच्छा देऊन आणि आभार प्रदर्शनाने सत्राचा समारोप झाला.

## इयत्ता दहावीसाठी प्रेरक सत्र

दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली द्वारे इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरक व्याख्यान आयोजित केले गेले. सत्रात एसएससी बोर्डाच्या परीक्षेत कामगिरी सुधारण्यासाठी प्रभावी वेळेचे व्यवस्थापन आणि धोरणांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. वक्ते श्री. परेश शाह (M.Sc., B.Ed.) आणि श्री. नीलेश यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक अभ्यास तंत्र आणि परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त टिप्स देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रम माहितीपूर्ण आणि उत्साहवर्धक होता. यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची तयारी पक्की करण्यात मदत झाली आणि त्यांना परीक्षेत भरघोस यश मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यास प्रवृत्त केले.

**विद्याभवन हायस्कूल नं. २ आंतरशालेय स्पर्धांमध्ये विजयी**

सरस्वती विद्यानिकेतन शाळेने निबंध लेखन, विज्ञान प्रश्नमंजूषा, रेखाचित्र आणि उत्स्फूर्त वक्तृत्व यासह आंतरशालेय स्पर्धांची मालिका आयोजित केली होती. विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या विद्यार्थ्यांनी प्रत्येक कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन केले आणि सर्व श्रेणींमध्ये अव्वल स्थान मिळवले. उत्कृष्टतेची परंपरा पुढे चालू ठेवत, विद्याभवन हायस्कूल नं. २ ला पुन्हा एकदा सर्वाधिक बक्षिसे जिंकल्याबद्दल फिरती ट्रॉफी मिळाली.

**साक्षरता घोषवाक्य कृतिकार्यक्रम**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी, कलाशिक्षक श्री. सुहास गरदडे यांच्या मार्गदर्शनाखाली, केंद्र सरकारच्या नवीन साक्षरता मोहिमेअंतर्गत साक्षरता घोषवाक्य उपक्रम आयोजित केला होता. शिक्षण, साक्षरता आणि बाबासाहेबांच्या प्रेरणादायी संदेशाच्या महत्त्वाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा यामागचा उद्देश होता. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' या संकल्पनेवर आधारित विद्यार्थ्यांनी साक्षरता, शिक्षण, ज्ञान आणि विकास यासारख्या विषयांवर सर्जनशील आणि अर्थपूर्ण घोषणा तयार केल्या. या उपक्रमामुळे त्यांची भाषिक कौशल्य वाढविण्यात आणि बाबासाहेबांच्या शैक्षणिक आदर्शांबद्दलची त्यांची समज दृढ करण्यात मदत झाली.

**आंतरशालेय चित्रकला स्पर्धा-यशोगाथा**

टाइम्स न्यूजपेपर इन एज्युकेशन (NIE) यांच्या वतीने टेकी ज्युनियर्स यांच्या सहकार्याने दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सेंट मेरीज स्कूल, भायखळा येथे आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुंबईतील ११० हून अधिक शाळांमधील सुमारे ६१० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा लहान गट व मोठा गट अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली होती.

सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ मधील विद्यार्थिनी कु. हर्षवर्धिनी के. पडवळ इ. ५वी/अ हिने लहान गटात तृतीय क्रमांक पटकावला. तिला रु. १५००/- रोख पारितोषिक, तसेच चषक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

**आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा**

माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे आयोजित कुलगुरू दादासाहेब केतकर आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा गुरूवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी विद्याभवन संकुलातील अप्पासाहेब गरगटे सभागृहात पार पडली. सदर स्पर्धेचे उद्घाटन कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, यांनी केले. सर्वप्रथम कुलगुरू दादांच्या प्रतिमेस कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी पुष्पहार अर्पण केला. सदर कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी मंडळाचे कोषाध्यक्ष श्री. प्रकाश सादमे, मंडळाचे पदाधिकारी श्री. रविंद्र अमृतकर तसेच मराठी विभागाच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व इंग्रजी विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर तसेच समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन व विद्याभवन हायस्कूल नं. २ चे माजी मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील हे उपस्थित होते. या स्पर्धेत एकूण १८ शाळांमधील ३५ विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेच्या शेवटी विजेत्या स्पर्धकांना संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, तसेच श्रीमती योगिनी पोतदार, श्रीमती ज्योती देसाई, श्री. प्रकाश पवार, श्री. सुनील पाटील यांनी ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

**ध्यान सत्र**

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंट (PSSM) संघातर्फे पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन हायस्कूल नं. २ इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी सेमिनार हॉलमध्ये ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सत्रात PSSM संघाच्या सदस्या सौ. बीना खोत यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात ध्यानाचे महत्त्व समजावून सांगितले. एकाग्रता, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता तसेच अभ्यास व इतर

उपक्रमांतील कामगिरी सुधारण्यासाठी नियमित ध्यान करण्याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमाची सांगता कु. वेदा काकड (इ. ९वी) या विद्यार्थीनीच्या आभार प्रदर्शनाने झाली.

**डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२५-२६**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा ही ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे -

**इ. ६वी** : या स्पर्धेत ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, त्यापैकी ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यामधून ३ विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली आहे.

**इ. ९वी** : या स्पर्धेत २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून त्यापैकी १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामधून ५ विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

**आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धा**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे आयोजित कै. मारूती लक्ष्मण मराठे आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धा शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी विद्याभवन संकुलातील सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचे उद्घाटन कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते पार पडले. सदर कार्यक्रमासाठी माध्यमिक मराठी विभागाच्या प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार व इंग्रजी विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, उपप्राचार्य श्रीमती ज्योती देसाई, माध्यमिक इंग्रजी विभागाच्या समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, माध्यमिक इंग्रजी विभागाचे माजी मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील इ. उपस्थित होते.

या स्पर्धेत विविध शाळेतील एकूण १२७ विद्यार्थी सहभागी झाले होते. विजेत्या स्पर्धकांना प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, माध्यमिक इंग्रजी विभागाचे माजी मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील व सहा. शिक्षिका श्रीमती अस्मिता चौधरी यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धा व्यवस्थित पार पाडण्यास शाळेचे माजी विद्यार्थी श्री. केतन पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी बहुमोल सहकार्य केले.

**बालिका दिवस**

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती चे औचित्य साधून बालिका दिवस साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन भाषणे, नाट्य, काव्य इत्यादी सादर करून या दिवसाचे महत्त्व समजून घेतले. सर्व वर्गशिक्षक व विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांस सावित्रीबाई फुले यांचा जीवनप्रवास समजावून सांगितला. मुलींना जीवनात पुढे जाण्यासाठी जबाबदारीने कसे वागावे हे समजून घेऊन भविष्यात देशाला पुढे नेण्यासाठी काय करावे हे मुद्दे चर्चात्मक रूपात मांडले.

**विज्ञान १ आणि विज्ञान २ साठी मार्गदर्शन व्याख्यान**

दि. ४ जानेवारी २०२६ रोजी विद्याभवन हायस्कूल नं.२, सेमिनार हॉल येथे इयत्ता १०वी (MSBSE) च्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान १ आणि विज्ञान २ वरील दोन मार्गदर्शन व्याख्यान सत्रे आयोजित करण्यात आली होती. विज्ञान १ सत्राचे संचालन श्री. साहिल बावदाने (इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनमध्ये पदव्युत्तर, राज्यशास्त्रात पदव्युत्तर) आणि श्री. राहुल गलांडे (बी. एस्सी, एमबीए इन क्लिनिकल रिसर्च अँड प्रोजेक्ट मॅनेजमेंट) यांनी केले. विज्ञान २ सत्राचे संचालन श्रीमती नम्रता जयस्वाल (एम. एस्सी. वनस्पती विज्ञान, झुनझुनवाला कॉलेजमध्ये पदवी महाविद्यालयात प्राध्यापिका) यांनी केले. वक्त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, महत्त्वाची प्रकरणे, परीक्षा पद्धती आणि प्रभावी तयारी धोरणे यावर मार्गदर्शन केले. योग्य उत्तर लेखन, संख्या, आकृत्या आणि पुनरावृत्ती तंत्रावर भर देण्यात आला. ही सत्रे परस्परसंवादी होती आणि बोर्ड

परीक्षेच्या तयारीसाठी उपयुक्त ठरली. विज्ञान पहिल्या सत्रासाठी प्राची परब आणि विज्ञान दुसऱ्या सत्रासाठी आयुष पवार यांनी आभार मानले.

**५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन**

दि. ५ ते ७ जानेवारी २०२६ दरम्यान बंट्स संघ आरती शशिकिरण शेट्टी ज्युनियर कॉलेज, कुर्ला (पूर्व) येथे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनात विद्याभवन क्र. २ ने पुढील बक्षीस प्राप्त केले आहे.

ज्येष्ठ गट (दिव्यांग श्रेणी)
तृतीय पारितोषिक
प्रकल्पाचे शीर्षक - Peel That Heals

| विद्यार्थिनींची नावे | इयत्ता |
|---|---|
| १. कु. रसाळ पौर्णिमा सुरेश | ९वी/अ |
| २. कु. पुजारी दिया हरिश | ९वी/अ |
| ३. कु. गोळे कस्तुरी रमेश | ९वी/अ |
| ४. कु. मांजरेकर रिया जितेश | ९वी/अ |

**विद्यार्थिनीचे राज्यस्तरीय चित्रकला ग्रेड परीक्षेत उज्ज्वल यश**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेत विद्याभवन क्र. २ ने पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा निकाल अलीकडेच जाहीर झाला आहे.

या परीक्षेत इ. ८वी/ब ची विद्यार्थिनी कु. जान्हवी नवनाथ इथापे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून पहिल्या १०० विद्यार्थ्यांमध्ये तिचा राज्यस्तरीय १६ वा क्रमांक आला आहे. तसेच 'वस्तुचित्रण (Object Drawing)' या विषयात तिने राज्यस्तरीय १० वा क्रमांक पटकावला आहे.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने तिला एकूण रु. ४,०००/- चे पारितोषिक (राज्य क्रमांकासाठी रु. ३,०००/- आणि वस्तुचित्रण विषयासाठी रु. १,०००/-) प्रदान करण्यात येणार आहे. कु. जान्हवी इथापे हिच्या या नेत्रदीपक यशाबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन तसेच तिला मार्गदर्शन करणारे कला शिक्षक श्री. संदीप तावडे व श्री. सुहास गरदडे यांचेही अभिनंदन! ***

**✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻**



सलाम बॉम्बे फाऊंडेशन तर्फे आयोजित चित्रकला स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, कला शिक्षक श्री. अर्जुन मस्के

# विद्याभवन संकुल
# नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा
### नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन व शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई शाळा क्र. ९३, सीवूडस् येथे घेण्यात आली. या स्पर्धेत प्राथमिक मराठी शाळेने सुयश प्राप्त केले. प्राथमिक गटातून कु. उल्का राजेश झगडे (इ.७वी) या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तिने 'मानसिक आरोग्य' या विषयावर प्रभावीपणे आपला प्रकल्प सादर केला.

शिक्षक गटातून शैक्षणिक साधन निर्मिती या स्पर्धेत श्रीमती राधिका अक्षय भोसले यांनी सादर केलेल्या गणितीय संकल्पनांवर आधारित Maths Garden या प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

### क्षेत्रभेट

नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शन नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३, सीवूडस् येथे भरविण्यात आले. दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास भेट देऊन माहिती घेतली. या प्रदर्शनात विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगाद्वारे समजल्या. प्रश्न विचारण्याची सवय, निरीक्षण शक्ती, सर्जनशील विचारांना चालना मिळाली. विज्ञानाचा दैनंदिन जीवनातील उपयोग स्पष्ट झाला. सौरऊर्जेवर आधारित उपकरणे, जलसंवर्धन, पाणी शुद्धीकरण प्रकल्प, पर्यावरण संरक्षणाशी संबंधित मॉडेल्स्, रोबोटिक्स् व कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रकल्प, मानसिक आरोग्य, पोषण व आरोग्य इ. प्रकल्प विद्यार्थ्यांनी अभ्यासले. विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारून माहिती घेतली. ही भेट अत्यंत ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक बनतो.

### शिक्षण परिषद

शनिवार दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९, नेरूळ याठिकाणी समूह साधन केंद्र, बेलापूर या गटाच्या शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. केंद्र समन्वयक श्रीमती रेखा पाटील, केंद्रातील शाळांच्या मुख्याध्यापिका, विद्याभवन, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, शिक्षकवर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या शिक्षण परिषदेत सकारात्मक शिस्त, निपुण महाराष्ट्र, विद्यार्थी सुरक्षितता, डॉ. जयंत नारळीकर गणित विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम इ. विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली. श्रीमती नूतन गवांदे, श्रीमती राधिका भोसले आणि श्रीमती आरती औचर या शिक्षिका शिक्षण परिषदेस उपस्थित होत्या.

### आनंददायी शैक्षणिक सहल

दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी मॉंटेरिया व्हिलेज, नेरळ येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला व सहलीचा मनमुराद आनंद लुटला. मॉंटेरिया व्हिलेज येथे विद्यार्थ्यांना पारंपरिक, ग्रामीण जीवनशैलीचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. गावोगावच्या पद्धती, चालीरिती, बारा बलुतेदारांची माहिती, पारंपरिक व्यवसाय, शेतीची पध्दत, जादूचे प्रयोग, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ, डोंबारी खेळ या गोष्टी विद्यार्थ्यांना जवळून पाहता आल्या. यामुळे विद्यार्थ्यांचे मनोरंजन तर झालेच शिवाय ग्रामीण संस्कृतीबद्दल त्यांना प्रत्यक्ष ज्ञान मिळाले.

मॉंटेरिया व्हिलेजमध्ये विविध वस्तूंची माहिती घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. ट्रॅक्टर सफारीचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी अत्यंत रोमांचक ठरला. विद्यार्थ्यांनी झोपाळा, गोशाळा, गार्डनमधे खेळ इ. गोष्टींचा आनंद घेतला. सर्व विद्यार्थ्यांनी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला. भोजनानंतर विद्यार्थ्यांनी स्विमिंग पूलमध्ये उतरुन पोहोण्याचा आनंद घेतला. रेनडान्स करून धमाल केली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली. त्यांची निरीक्षणशक्ती विकसित झाली. अशा प्रकारच्या शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात.

**वैद्यकीय तपासणी**

अपोलो हॉस्पिटल, नेरूळ यांच्या सहकार्याने दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी शाळेत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या तपासणी शिबिरामध्ये अपोलो हॉस्पिटलचे अनुभवी डॉक्टर, परिचारिका व वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते. इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. उंची व वजन, दात व तोंडाची तपासणी, सामान्य शारीरिक तपासणी करण्यात आली. काही विद्यार्थ्यांमध्ये आढळलेल्या किरकोळ आरोग्य समस्यांबाबत पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरुकता निर्माण झाली. पालकांना पाल्यांच्या आरोग्याविषयी माहिती मिळाली.

**विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान**

गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी साद फाउंडेशन तर्फे इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. श्रीमती श्वेता पवार यांनी मासिक पाळी म्हणजे काय? मासिक पाळी का येते? वैयक्तिक स्वच्छता कशी राखावी, कोणता आहार घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले. सॅनिटरी नॅपकिनचा योग्य वापर करावा. पॅड बदलण्याची योग्य वेळ व त्यांची सुरक्षित विल्हेवाट कशी लावावी. याबाबत सविस्तर माहिती दिली. या काळात शरीरात होणारे बदल, आहार, विश्रांती याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शेवटी प्रश्नोत्तराच्या सत्रात मुलींच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. विद्यार्थिनींसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरला.

**सकस व पौष्टिक आहार मार्गदर्शन**

दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी साद फाउंडेशन तर्फे सकस व पौष्टिक आहार या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. साद फाउंडेशनचे श्री. हर्ष आखाडे यांनी पौष्टिक आहार कसा घ्यावा याविषयी मार्गदर्शन केले. सकस आहाराची संकल्पना स्पष्ट करताना फळे, दूध, हिरव्या भाज्या, कडधान्ये या सर्व पदार्थांचा समावेश आहारात करावा याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. श्रीमती नूतन गवांदे यांनी मार्गदर्शकांचे आभार मानले.

**स्काऊट - गाईड शिबिराचे आयोजन**

शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी इ. ७वीच्या विद्यार्थ्यांच्या सर्गांगीण विकासासाठी स्काऊट - गाईड शिबिराचे आयोजन करण्यात आले. दु. १२ वाजता सर्व विद्यार्थी स्काऊट गाईडच्या गणवेशात उपस्थित राहिले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, शिक्षक, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत गाईड कॅप्टन श्रीमती नूतन गवांदे व स्काऊट कॅप्टन श्रीमती आरती औचर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजवंदन, ध्वजगीत, सर्वधर्म प्रार्थना, परिपाठ व उपस्थिती घेण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गटानुसार तंबू उभारले. पर्यावरणपूरक साहित्य वापरून, शिकविलेल्या गाठींचा उपयोग करून सुंदर तंबू उभारले. प्राथमिक उपचारांची माहिती, स्वच्छता अभियान, समूहखेळ इ. नैतिक मूल्यांवर आधारित मार्गदर्शनपर सत्रे घेण्यात आली. श्रीमती सुवर्णा तळेकर यांनी स्वसंरक्षणाचे धडे दिले. आपत्कालीन प्रसंगी स्वत:चा बचाव कसा करावा याचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले. तंबूंचे परीक्षण करून उत्कृष्ट तंबू निवडण्यात आला. संध्याकाळी ऊब देणारी शेकोटी प्रज्वलीत करण्यात आली. शेकोटीभोवती फेर धरत, नाचत, गात विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. त्यानंतर

विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक, मनोरंजनपर कार्यक्रम सादर केले, विनोद, खेळ, घोषवाक्ये, लोकनृत्ये इ. कार्यक्रम याप्रसंगी आयोजित करण्यात आले. सादर केलेल्या कार्यक्रमांमधील सर्वोत्कृष्ट कार्यक्रमांना बक्षिसे वितरीत करण्यात आली. बक्षिस समारंभ घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. या उपक्रमामुळे संघभावना, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, सहकार्य, स्वयंशिस्त इ. गुणांची जोपासना होते.

### आनंददायी शनिवार अंतर्गत ध्यानधारणा व झुंबा

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी आनंददायी शनिवार अंतर्गत ध्यानधारणा या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जागतिक ध्यानधारणा दिनानिमित्त आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्यातर्फे हा उपक्रम घेण्यात आला. श्रीमती चेतना सिंग व श्रीमती स्वाती व्यास या अतिथींचा सत्कार मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आला. श्रीमती चेतना सिंग यांनी ध्यानधारणेचे महत्त्व सांगितले. सुदृढ आरोग्यासाठी ध्यानधारणा आवश्यक आहे. त्यासाठी प्राणायाम करावा याविषयी मार्गदर्शन केले. विविध योगप्रकार व आसनांचा सराव घेतला. ध्यानधारणेमुळे लाभणाऱ्या मन:शांती, एकाग्रता व आत्मनियंत्रणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. झुंबा नृत्य घेण्यात आले. हात, पाय, कंबर यांची योग्य पद्धतीने हालचाल म्हणजे झुंबा नृत्य. विद्यार्थ्यांनी उत्साहाने व आनंदाने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

### हिंद की चादर

श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५०व्या शहीद समागम शताब्दी वर्षानिमित्त हिंद की चादर हा कार्यक्रम दि. २० डिसेंबर रोजी घेण्यात आला. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ उपस्थित होत्या. श्रीमती नूतन गवांदे यांनी गुरू तेग बहादूर यांच्याविषयी माहिती सांगितली. प्रत्येकाने आपल्या धर्माचा अभिमान बाळगावा. त्याग, शौर्य, स्वातंत्र्य, मानवता या गुणांचे उदाहरण म्हणजे गुरू तेग बहादूर. त्यांच्या गुणांचे अनुकरण करावे असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. कु. प्रांजल अभंग या विद्यार्थिनीने आपल्या भाषणातून शीख धर्माचे मौलिक विचार मांडले. निबंधलेखन स्पर्धा घेण्यात आली. 'हिंद की चादर' या प्रेरणा गीताची ध्वनीफित ऐकून कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ

दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी विद्यार्थिनी कु. नीलम तरकसबंद, एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व (माजी विद्यार्थिनी) या उपस्थित होत्या. तसेच पुणे विद्यार्थी गृह स्पोर्ट्स ॲकॅडमीच्या कराटे कोच श्रीमती सुवर्णा तळेकर व ॲकॅडमीचे इतर सहकारी देखील उपस्थित होते. सरस्वती व गणेशपूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. शिक्षक श्री. संकेत थळे यांनी कु. नीलम तरकसबंद यांचा परिचय करून दिला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुस्तकरूपी भेट देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर मंचावरील मान्यवरांच्या हस्ते शाळेतील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सुयश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पदके देऊन गौरविण्यात आले. कु. नीलम तरकसबंद यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, काही वर्षांपूर्वी मी सुद्धा याच शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या रांगेत बक्षीस घेण्यासाठी बसलेली असायची व कधी बक्षीस मिळेल याची आतुरतेने वाट पाहायची, माझी एक बकेट लिस्ट आहे आणि त्यामध्ये ज्या शाळेत मी शिकले त्या शाळेत मला अतिथी म्हणून जायचे आहे ही माझी एकइच्छा होती, आज माझी ही इच्छा पूर्ण झाली, याबद्दल मी शाळेचे आभार मानते. खेळामुळे आपले शरीर मजबूत राहते, आनंदी राहते

आणि शिस्त लागते तसेच खेळामध्ये प्रामणिकपणा आणि चिकाटी देखील खूप महत्त्वाची आहे असे मार्गदर्शन श्रीमती सुवर्णा तळेकर यांनी विद्यार्थ्यांना केले व पदके मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ आणि श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. शिक्षक श्री. संकेत थळे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व वंदेमारतम्ने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

**आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धा**

दि. १९.१२.२०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग, आयोजित कै. मारुती लक्ष्मण मराठे स्मृतीप्रीत्यर्थ आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागातील विद्यार्थिनी कु. सिया ब्रिजेश पाल हिने मुलींमध्ये सब-ज्युनियर गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. बक्षीस स्वरूपात तिला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. संस्थेच्या वतीने तिचे हार्दिक अभिनंदन!

**शालेय सहल**

दि. १९.१२.२०२५ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांची शालेय सहल मॉन्टेरिया व्हिलेज, नेरळ येथे घेण्यात आली. एकूण १९८ विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह ही सहल नेण्यात आली. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांना १२ बलुतेदारांची कार्ये कशी चालतात याविषयी माहिती देण्यात आली. लोहारकाम, सुतारकाम, कुंभारकाम, शिलाईकाम, विणकाम, पापड बनवणे इत्यादी कार्याचा प्रत्येक विद्यार्थ्यांने अनुभव घेतला. शिवाय जादूगाराचा खेळ, वेगवेगळ्या प्रकारची हास्यास्पद प्रतिमा दाखवणारे आरसे असे मनोरंजनात्मक खेळ देखील विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या गाईच्या जाती, त्यांच्या मलमूत्रापासून बनलेला बायोगॅस प्लांट, तो कसा काम करतो, याविषयीचे प्रात्यक्षिक देखील विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. शेतीविषयी माहिती देताना भेंडी, वांगी, मका, दूधीभोपळा, कोबी, तोंडली, गवार इ. फळभाज्यांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. खेडेगावातील नगररचना, वारली चित्रांनी नटलेली घरे हे सर्व ट्रॅक्टरच्या सवारीमध्ये बसवून विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. दुपारच्या जेवणानंतर सर्व विद्यार्थ्यांनी स्विमिंग पूलमध्ये पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला. सहलीमध्ये विद्यार्थ्यांना सकाळचा अल्पोपहार, दुपारचे जेवण व परतीच्या वेळी वडापाव व लिंबू सरबत देण्यात आले. रात्री सात वाजता सहल शाळेमध्ये परतली.

**राष्ट्रीय कराटे स्पर्धा**

खेळ महाराष्ट्र या राष्ट्रीय पातळीवरील कराटे स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले. ही स्पर्धा ३० नोव्हेंबर २०२५ रोजी टिळक कॉलेज, नेरूळ येथे आयोजित करण्यात आली होती.

| विद्यार्थ्यांचे नाव | कराटे प्रकार | प्राप्त पदक |
|---|---|---|
| कु. शर्वरी दाभोळे | काता | सुवर्ण पदक |
| कु. विराट घोरपडे | काता | सुवर्ण पदक |
| | कुमिते | कांस्य पदक |
| कु. आर्यन नागरगोजे | कुमिते | सुवर्ण पदक |
| | काता | कांस्य पदक |
| कु. नेहा सिरसाट | काता | रौप्य पदक |
| कु. माही नागरगोजे | काता | रौप्य पदक |
| | कुमिते | कांस्य पदक |
| कु. काव्या जोरी | कुमिते | कांस्य पदक |
| | काता | कांस्य पदक |
| कु. विहा चाळके | काता | कांस्य पदक |
| | कुमिते | कांस्य पदक |

**आरोग्य तपासणी**

दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी अपोलो रुग्णालयातर्फे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ. अनिल शाहू व त्यांचे सहकारी श्रीमती सारिका शेगावकर, श्रीमती शालिनी सिंग, श्रीमती संध्या गायकवाड व श्रीमती ज्योती गायकवाड यांनी

विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. या तपासणी दरम्यान विद्यार्थ्यांचे वजन, उंची यांचे मोजमाप तसेच दंत तपासणी करण्यात आली. जेवणानंतर नियमित चूळ भरावी, चांगल्या आरोग्यासाठी सात्विक आहार घ्यावा, मैदायुक्त पदार्थ खाण्याचे टाळावे, असे मार्गदर्शन या आरोग्य तपासणीदरम्यान डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना केले.

### आंतरशालेय जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

दि. २० डिसेंबर २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह स्पोर्टस अकॅडमी आयोजित जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत विद्यार्थी कु. तनुष देवेंद्र पाटील इ. ४थी याने १० वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये द्वितीय क्रमांक संपादित केला. बक्षीस स्वरूपात त्याला रौप्य पदक व चित्रकला संच देऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा विद्याभवन शाळा, घाटकोपर येथे घेण्यात आली.

### 'माझे गुरू, माझा आदर्श' कुपन स्पर्धा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये दै. लोकमत यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कुपन स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादित केले.

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त बक्षिस |
|---|---|
| कु. देवांश संदीप खामकर | बॉटल |
| कु. शनया सचिन शिंदे | किटली |
| कु. दुर्वा मनीष जाधव | एक्झाम पॅड |
| कु. आयुष सुशांत निंबाळकर | एक्झाम पॅड |
| कु. सानवी सचिन मंदावकर | एक्झाम पॅड |
| कु. वंश प्रेमनाथ पाटील | एक्झाम पॅड |
| कु. अभिराज अमर माहींद | एक्झाम पॅड |
| कु. शौर्य महेश भोसले | एक्झाम पॅड |
| कु. स्पर्श खंडू महाले | एक्झाम पॅड |
| कु. हर्ष सिध्दार्थ तडके | एक्झाम पॅड |
| कु. सौम्य पाटीलबुवा दगाबाज | एक्झाम पॅड |
| कु. भव्य सिध्दार्थ तडके | एक्झाम पॅड |

### ब्रेनोब्रेन अबॅकस स्पर्धा

दि. ११ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या १७४ व्या ब्रेनोब्रेन अबॅकस विभागीय पातळीवरील स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादित केले.

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त बक्षिस |
|---|---|
| कु. विराट तुषार घोरपडे | चॅम्पियन्स ट्रॉफी |
| कु. माही भागवत नागरगोजे | चॅम्पियन्स ट्रॉफी |
| कु. अयांश विकास इंगवले | चॅम्पियन्स ट्रॉफी |
| कु. आर्यन भागवत नागरगोजे | चॅम्पियन्स ट्रॉफी |
| कु. स्वानंद विजय घेवारी | सुवर्ण पदक |
| कु. अर्चित श्रीकांत जाधव | सुवर्ण पदक |
| कु. शर्वरी रविराज दाभोळे | सुवर्ण पदक |
| कु.काव्या विजय साळवे | सुवर्ण पदक |

### आंतरशालेय कराटे पंचेस आणि किक बॉक्सिंग स्पर्धा

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी पुणे विद्यार्थी गृह स्पोर्टस अकॅडमी यांच्यातर्फे आयोजित कराटे पंचेस आणि किक बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन घाटकोपर येथील विद्याभवन शाळेत करण्यात आले होते. या स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादित केले.

| विद्यार्थ्याचे नाव | स्पर्धा प्रकार | प्राप्त पदक |
|---|---|---|
| कु. आर प्रजिथ रामालिंगमराज पिल्लई | पंच | रौप्य |
| कु. मृणालिनी रूपेश चाळके | पंच | कांस्य |
| कु. ईश्वरी विनायक थोरात | किक/ पंच | रौप्य |
| कु. प्रांजल अमोल पाटील | पंच | सुवर्ण |

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : श्रीमती श्रीजा नायर**

### कोलगेट हेल्दी टीथ जागरुकता मोहिम

दि. २ डिसेंबर २०२५ रोजी विद्याभवन शाळेत विद्यार्थ्यांना चांगल्या दंत स्वच्छतेबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी कोलगेट हेल्दी टिथ कॅम्पेन आयोजित केले होते. SHARP NGO मार्फत दात व हिरड्या निरोगी राखण्यासाठी व चांगल्या सवयींचे महत्त्व

अधोरेखित करणाऱ्या एका संवादात्मक सत्राचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना एक व्हिडिओ दाखवून तोंडाची दैनंदिन स्वच्छता व दंत काळजीच्या टिप्स देण्यात आल्या. कोलगेट टूथपेस्ट व ब्रश तसेच पत्रके वाटण्यात आली.

### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील सुयश

दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात विज्ञान शिक्षक मनोज मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ८वी ते १२वी गटात कु. खुशी प्रभाकर शिंदे आणि कु. जान्हवी राजाराम जंगम इ. ९वी या विद्यार्थिनींनी 'ग्रीन फ्युजन ४एक्स' या नावाने घरगुती कचऱ्यापासून तयार केलेले डिशवॉशर, फ्लोअर क्लिनर, टॉयलेट क्लिनर व वनस्पती खत असे चार अभिनव प्रकल्प सादर केले. या प्रकल्पासाठी त्यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

### होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२५

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन तर्फे आयोजित होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा स्पर्धा २०२५ मध्ये घेण्यात आली. सदर परीक्षेमध्ये ३० प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ. |
|---|---|
| कु. आरिझ फिरोज पटवेगार | ९वी |
| कु. प्रिन्स उमेश वैश्य | ९वी |
| कु. गार्गी रूपेश कांबळे | ९वी |
| कु. आदित्य विजय सरोदे | ९वी |
| कु. अस्मित शशिकांत ठाकूर | ९वी |
| कु. जान्हवी राजाराम जंगम | ९वी |
| कु. ओम पवार | ६वी |
| कु. शुभ पवार | ६वी |
| कु. अर्णव सावंत | ६वी |
| कु. आरोही भुजबळ | ६वी |
| कु. हेमंतकुमार चौधरी | ६वी |

### वार्षिक क्रीडा महोत्सव

दि. १८ व १९ डिसेंबर २०२५ रोजी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख अतिथी श्री. प्रशांत सुर्वे (राष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक) यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी श्री. प्रशांत सुर्वे यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे मार्गदर्शन करताना खेळाडूंमध्ये एकाग्रता, शिस्त, आत्मविश्वास जिद्द यांचे महत्त्व सांगितले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी क्रिकेटर सचिन तेंडुलकर आणि त्यांचे प्रशिक्षक आचरेकर सर यांच्या योगदानाचे उदाहरण दिले. तसेच खेळामध्ये सकारात्मकता असावी व विद्यार्थ्यांनी दररोज एक तास तरी मैदानी खेळ खेळावेत असे आवाहन केले. डॉजबॉल, व्हॉलीबॉल, लंगडी अशा सांघिक खेळांचे तर दोरीउड्या, गोळाफेक, धावणे अशा वैयक्तिक खेळांचा समावेश क्रीडा महोत्सवात करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शीतल येंगे यांनी केले. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात क्रीडा महोत्सव पार पडला.

### वक्तृत्व स्पर्धेतील सुयश

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित कुलगुरू दादासाहेब केतकर स्मृतिप्रीत्यर्थ आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा दि. २० डिसेंबर २०२५ रोजी घाटकोपर येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेत माध्यमिक इंग्रजी विभागाच्या इ. १० वीच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थिनी कु. गौरी अशोक आहेर हिने द्वितीय क्रमांक तसेच कु. सुहानी प्रसन्नकुमार कांबळे व कु. आर्या सागर नाक्ती या विद्यार्थिनींचे वक्तृत्व परीक्षकांच्या विशेष प्रशंसेस पात्र ठरले. या कामगिरीमुळे माध्यमिक इंग्रजी विभागाने सांघिक ट्रॉफी जिंकत विद्याभवनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी व सेमी इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**अभिनंदनीय**

पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागाने आंतरशालेय गीता पाठांतर स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये गीतेतील १५वा आध्याय (मराठी भाषा) यामध्ये पुढील विद्यार्थ्यांनी पारितोषिके प्राप्त केली.

| विद्यार्थ्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. प्रियांश समीर भोसले | प्रथम |
| कु. अद्वैत तेजस सुर्वे | तृतीय |

**मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धा (पूर्व-प्राथमिक मराठी)**

मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धेत पूर्व-प्राथमिक मराठी विभागाच्या कु. अथर्व त्र्यंबक जाधव (मोठा शिशु) याने प्रथम क्रमांक संपादन केला.

**वेशभूषा स्पर्धा (पूर्व-प्राथमिक मराठी)**

गुरुवार दि १९.११.२०२५ रोजी पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी विभागातील मोठा शिशु वर्गातील विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा पार पडली. वेशभूषा स्पर्धेचा विषय 'पर्यावरण संवर्धन' हा होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीमती प्रिया राठोड आणि श्रीमती दर्शना सपकाळ उपस्थित होत्या. शुक्रवार दि. २०.११.२०२५ रोजी नर्सरी व छोटा शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांची वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. छोटा शिशु वर्गाचा विषय 'आपले मदतनीस' तर नर्सरी वर्गाचा विषय 'फळे' हा होता. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. संकेत थळे आणि श्रीमती शीतल बाबर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी आकर्षक वेशभूषा आणि विषयानुरूप संवाद यांची सांगड घालून सुंदर सादरीकरण केले. वरील स्पर्धांमध्ये गुणानुक्रमे विद्यार्थ्यांना बक्षिसे प्राप्त झाली.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन !** ***


**संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती**

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | |
|---|---|
| Bank A/c Name | : **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : **Bank of Baroda** |
| Branch | : **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : **BARB0SADASH** <br> **The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : **411012009** |

बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल : pvgheadoffice@gmail.com

## विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
### तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**
**प्राचार्य : श्री. शरद कोठावदे**

### आहार मार्गदर्शन शिबिर

दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी विद्यालयात आहार मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात एस. एम. बी. टी. वैद्यकीय महाविद्यालय धामणगाव येथील डॉ. दीप्ती कुलकर्णी व डॉ. चेतना तांबे यांनी विद्यार्थ्यांना पॅकेट फुडच्या दुष्परिणामांविषयी पीपीटीच्या माध्यमातून व विविध पोस्टरच्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांना नियमित घरचे व ताजे अन्न सेवन करण्याचे आवाहन केले कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व शिक्षक प्रतिनिधी श्रीमती प्रीती राजपूत यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी समयोचित भाषणे केली. श्री. सुकदेव निंबेकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. आभार सौ. स्वाती भावसार यांनी मानले.

### स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात स्वामी विवेकानंद यांची जयंती व राजमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व शिक्षक प्रतिनिधी श्रीमती प्रीती राजपूत यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी साक्षी पगार, साक्षी चव्हाण, ज्ञानेश्वरी पगार या विद्यार्थिनींनी जिजाऊंच्या जीवनाविषयी गारद व पाळणा सादर केला. स्नेहा पगार ही विद्यार्थिनी जिजाऊंच्या वेशात उपस्थित होती. यावेळी विद्यार्थिनींनी समयोचित भाषणे केली. राजमाता जिजाऊंच्या व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याविषयी सौ. स्वाती भावसार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याधापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे गुण अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती रक्षा शिवदे यांनी तर सूत्रसंचालन केले. आभार श्रीमती प्रीती राजपूत यांनी मानले.

### आरोग्य शिबिर

दि. १२ जानेवारी २०२६ रोजी विद्यालयात वेल्थ क्राफ्ट कंपनी लिमिटेड यांचेतर्फे इ. ६ वी ते बारावीच्या विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन शिबिर घेण्यात आले. यावेळी श्रीमती आकांक्षा बर्वे, श्रीमती ज्योती महाले, श्रीमती रोहिणी गुंबाडे, श्री. जितेंद्र बिलारकर, श्री. साहिल जाधव यांनी विद्यार्थिनींना मासिक पाळी, वैयक्तिक स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिन वापरण्याचे महत्त्व याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींच्या विविध शंकांचे निरसन केले तसेच मेडिकल मध्ये उपलब्ध असलेले केमिकल युक्त सॅनिटरी नॅपकिन न वापरता वेल्थक्राफ्ट कंपनीतर्फे नैसर्गिक पद्धतीने तयार करण्यात आलेले सॅनिटरी नॅपकिन वापरण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती संगीता कुवर यांनी केले

### अभिनंदनीय क्रीडा वृत्त

दि. २ व ३ जानेवारी २०२६ रोजी वर्धा जिल्ह्यातील शेलू या ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेत १९ वर्षाखालील विद्यालयाच्या मुलींच्या संघाने वर्धा संघाचा एक डाव दोन गुणांनी दणदणीत पराभव करून चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. त्याबद्दल या विद्यार्थिनींचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांचे उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, प्राचार्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून हार्दिक अभिनंदन करण्यात आले. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

### अपंगदिन

दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक अपंग दिनानिमित्त शिक्षिका सौ. भावना पाटील यांनी विद्यार्थ्यांना अपंग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. अपंग व्यक्तींना आपण सहकार्य केले पाहिजे, तसेच त्यांच्या प्रती सद्‌भावना व कृतज्ञता निर्माण करण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले. या दिनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अपंग व्यक्तींना मदत करण्याची भावना जागृत झाली आणि सामाजिक जाणीव वाढीस लागते.

### महापरिनिर्वाण दिन

दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. तसेच शिक्षिका सौ. शोभा थोरात यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याची माहिती सांगितली, 'त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे. भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये त्यांचा ऐतिहासिक वाटा आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळेच भारताला एक न्यायप्रिय, समतावादी संविधान मिळाले. आपले संविधान जागतिक स्तरावर अतिशय आदर्श आहे.'

### सशस्त्रसेना ध्वजदिन

दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी सशस्त्रसेना ध्वजदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त शिक्षिका सौ. अश्विनी चौधरी यांनी विद्यार्थ्यांना सशस्त्रसेना ध्वजदिनाची माहिती सांगताना, त्या म्हणाल्या 'आपल्या ध्वजाचा सन्मान करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे'.

### मानवी हक्कदिन

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी मानवी हक्कदिन निमित्त मानवाला स्वतंत्र जीवन जगण्याचा तसेच विचार मांडण्याचा अधिकार आहे. या अधिकाराची माहिती शिक्षिका सौ. अश्विनी भोये यांनी विद्यार्थ्यांना दिली.

### अभिनंदनीय

* दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी इ. ६वीच्या विद्यार्थ्यांचा डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या परीक्षेत ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कु. हंसिका हरिओम सोनवणे ही प्रात्यक्षिक परीक्षेस पात्र झाली आहे.

* दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी के. के. वाघ स्कूलमध्ये काकासाहेब वाघ स्मृतिचषक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. योगा स्पर्धेत विद्यार्थिनी कु. मृण्मयी दीक्षित, इ. ६वी हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिला सुवर्णपदक प्रमाणपत्र तसेच रोख रुपये ५००/- पारितोषिक मिळाले.

कु. हंसिका सोनवणे आणि क. मृण्मयी दीक्षित या दोघींचे आणि डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परिक्षेतील इतर सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### वार्षिक स्नेहसंमेलन

प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृहात दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त अत्यंत उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांनी गायलेल्या स्वागतगीताने आणि सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे उपस्थित होते. त्यांचे रोप व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संस्थेच्या देणगीदार श्रीमती सिंधूताई धामणकर,

माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य आणि पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी सौ. सुवर्णा पवार तसेच पालक शिक्षक संघाचे सभासद उपस्थित होते. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

प्राथमिक विभागातील विद्यार्थी कु. रुद्र घरटे व विद्यार्थिनी कु. सई सोनवणे तसेच पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थी कु. आरुष जाधव आणि विद्यार्थिनी कु. तीर्था मदाने व कु. ओवी पगार यांनी शाळेच्या आजवरच्या उल्लेखनीय यशाचा आढावा घेत वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी कु. श्रेयस भिरूड व विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. जान्हवी धिवरे यांनी केले.

प्रमुख पाहुणे व संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते शैक्षणिक व सहशैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून 'विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीवरच नव्हे तर सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर भर देऊन एखादी चांगली कला किंवा छंद जोपासावा तसेच मोबाईलचा वापर आवश्यक तेवढा करून भविष्यात आपण चांगले नागरिक होण्यासाठी प्रयत्नशील असावे' असा मौलिक सल्ला विद्यार्थ्यांना व पालकांना दिला.

अत्यंत आकर्षक सजावट केलेल्या मंचावर पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी रेट्रो, हिमगौरी आणि सात बुटके या संकल्पनेवर आधारित मनमोहक नृत्य सादर केले. रेट्रो संकल्पनेतून समृद्ध संस्कृती व परंपरेचा सन्मान करण्याचा संदेश देण्यात आला. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांनी भरघोस प्रतिसाद दिला. पंचवटी येथील काळाराम मंदिराच्या बाजूला असलेल्या पुणे विद्यार्थी गृहाच्या पंचवटी शाखेत जून २०२६ पासून इंग्रजी माध्यमाची कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल सुरू होत असून शाळेबद्दलची आणि तेथील प्रवेशप्रक्रिये विषयीची माहिती पालकांना देण्यात आली.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. शाळेच्या २५ वर्षाच्या रौप्यमहोत्सवी वाटचालीचे स्मरण या कार्यक्रमातून अधोरेखित झाले. याप्रसंगी म्हसरूळ विभागातील धामणकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील तसेच माजी मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

**अभिनंदनीय**

कलाविकास संस्था रत्नागिरी यांच्यातर्फे रंगबहार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा जुलै महिन्यात पार पडली. या स्पर्धेअंतर्गत चित्रकला, रंगभरण, हस्ताक्षर व कार्टून बनविणे या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत इ. १ली ते इ. ७वीच्या एकूण ६१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे-

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | प्राप्त बक्षीस |
|---|---|---|
| कु. प्रणिता डुमरे | १ली | सायकल, प्रमाणपत्र व ट्रॉफी |
| कु. अंतरा म्हस्के | २री | ट्रॉफी व प्रमाणपत्र |
| कु. शरयू अमोल जगदाळे | ३री | ट्रॉफी व प्रमाणपत्र |
| कु. मृण्मयी योगेश खराटे | ५वी | ट्रॉफी व प्रमाणपत्र |

**रंगभरण स्पर्धा**

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | प्राप्त बक्षीस |
|---|---|---|
| कु. स्पंदना म्हस्के | ७वी | ट्रॉफी व प्रमाणपत्र |
| कु. हृदया शिरसाट | १ली | सुवर्णपदक व प्रमाणपत्र |
| कु. स्वराली भावसार | ४थी | सुवर्णपदक व प्रमाणपत्र |
| कु. आराध्या दिवेकर | ६वी | सुवर्णपदक व |

| | | |
|---|---|---|
| | | प्रमाणपत्र |
| कु. आद्या वाघमारे | ७वी | सुवर्णपदक व प्रमाणपत्र |

**हस्ताक्षर स्पर्धा**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | प्राप्त बक्षीस |
|---|---|---|
| कु. समिक्षा धाकतोडे | १ली | सुवर्णपदक व प्रमाणपत्र |
| कु. शिवराज विसे | २री | सुवर्णपदक व प्रमाणपत्र |
| कु. ऋतुजा गांगोडे | ३री | रौप्यपदक व प्रमाणपत्र |
| कु. दुर्वेश बागुल | ४थी | सुवर्णपदक |
| कु. देवेश शेटे | ५वी | कांस्यपदक |
| कु. किमया चौधरी | ६वी | कांस्यपदक |
| कु. रुद्र सोनवणे | ७वी | कांस्यपदक |
| कु. आर्या वाघ | ४थी | कांस्यपदक |
| कु. आर्यन महाले | ६वी | सुवर्णपदक |
| कु. सोहम सूर्यवंशी | ७वी | कांस्यपदक |

तसेच शाळेला 'सुवर्णशाळा' हे बक्षीस मिळाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

***

**✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✻**







कलाविकास संस्था रत्नागिरी यांच्यातर्फे आयोजित रंगबहार स्पर्धेत चित्रकला, रंगभरण, हस्ताक्षर व कार्टून बनविणे अशा विभागांमध्ये बक्षीस प्राप्त विद्यार्थी ↑



→ काकासाहेब वाघ स्मृतिचषक स्पर्धेत बक्षीस प्राप्त विद्यार्थिनी कु. मृण्मयी दीक्षित, इ. ६वी

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

### माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**क्रीडा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा**

विभागात क्रीडा सप्ताह मोठ्या उत्साहात व खेळाडू वृत्तीच्या चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. शाळेचा हाऊस ध्वज फडकावून क्रीडा सप्ताहाचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला.

राज्य व विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मशाल रिले सादर केली. शिस्त, समर्पण व खेळाडू वृत्तीचे मूल्य रूजवण्यासाठी क्रीडा दीप प्रज्वलित करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी क्रीडा शपथ घेऊन नियमांचे प्रामाणिक पालन करण्याची प्रतिज्ञा केली. प्रमुख पाहुण्यांनी व्हॉलीबॉल मैदानावरील फीत कापून तसेच धावण्याच्या शर्यतीला झेंडा दाखवून विविध खेळांचे उद्घाटन केले.

संपूर्ण आठवडाभर विविध हाऊस प्रमाणे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये क्रिकेट, कबड्डी, दोरीखेच, व्हॉलीबॉल, संगीत खुर्ची, स्लो सायकलिंग तसेच मैदानी व धावण्याच्या स्पर्धांचा समावेश होता. ब्ल्यू, ग्रीन, रेड व यलो हाऊसच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रशस्त मैदानावर सक्रिय सहभाग नोंदवला. या प्रसंगी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य उपस्थित होत्या. क्रीडा सप्ताहाचा समारोप बक्षीस वितरण समारंभाने करण्यात आला. विजेत्या विद्यार्थ्यांना चषक, पदकं व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ**

दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शाळेतील गुणवत्ता व मूल्यांच्या पंचवीस वर्षाचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे सुप्रसिद्ध डॉ. हेमंत आप्पासाहेब सोनानीस तसेच कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि देणगीदार श्रीमती सिंधूताई धामणकर हे उपस्थित होते. तसेच पालक प्रतिनिधी, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलन व सरस्वती वंदनेने झाली. मान्यवरांचा वृक्षरोप देऊन सन्मान करण्यात आला. शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थी कु. पार्थ बोरसे व कु. प्रथमेश बोटवे इ. ९वी यांनी वार्षिक अहवाल सादर करून शाळेची शैक्षणिक प्रगती व सहशालेय उपक्रमाची माहिती दिली. आपल्या भाषणात डॉ. हेमंत सोनानीस यांनी संस्थेच्या दूरदृष्टी नेतृत्वाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना परिश्रम, निष्ठा व मानवतावादी मूल्य जपण्याचा संदेश दिला.

औपचारिक कार्यक्रमानंतर ''Harmony in Motion'' या संकल्पनेवर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. भारतातील विविध राज्य व जगभरातील संस्कृतीचा सुरेल व नृत्यमय प्रवास अनुभवायला मिळाला. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी विद्यार्थ्यांनी केवळ राष्ट्राचेच नव्हे तर जगाचे नागरिक म्हणून घडावे असा प्रेरणादायी संदेश दिला. सौ. उन्नती चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

***

## अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### वीर बाल दिवस उत्साहात साजरा

महाविद्यालयात वीर बाल दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वीर बाल दिवसाचे ऐतिहासिक व प्रेरणादायी महत्त्व स्पष्ट केले. तसेच एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. पंकज वाडिले यांनीही वीर बाल दिवसाचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. हर्षिता गिरासे आणि विद्यार्थी कु. आयुष कोर्डे यांनी केले. तसेच विद्यार्थिनी कु. हर्षिता गिरासे हिने उपस्थितांचे आभार मानले.

### सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ व कवयित्री क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य प्रा. डॉ. एम. व्ही. भालेराव उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात विभागप्रमुख डॉ. योगिता अहिरे, डॉ. सोनाली जाधव व कु. पायल भाटिया यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

या प्रसंगी सर्व विभागप्रमुख डॉ. अमोल रासने, प्रा. डॉ. विजय सोनवणे, प्रा. जगदीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्रा. इंद्रजीत सोनवणे, प्राध्यापक वृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभियांत्रिकीचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी श्री. यश मिरकर याने केले. यावेळी विद्यार्थी श्री. कृष्णा सिकची याने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची माहिती देताना, त्यांनी समाजातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षण पूर्ण केले व स्त्रीशिक्षणासाठी तसेच महिलांच्या हक्कांसाठी केलेल्या मोलाच्या कार्यावर प्रकाश टाकला. मुलींच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्यामुळेच त्यांचा जन्मदिन 'बालिका दिन' म्हणून साजरा केला जातो, असे त्याने नमूद केले.

विद्यार्थिनी कु. भाग्यश्री काकड हिने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. निवृत्ती डावखर, श्री. सोहम बांबळे व श्री. शुभम मुळे यांचे सहकार्य लाभले. ***

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

### सावित्रीबाई फुले जयंती साजरी

शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु. पायल चव्हाण हिने सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यविषयी व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु. कोमल अहिरे हिने केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ***


# हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.१२.२०२५ ते ३१.१२.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व


सिंधुताई त्र्यंबक केंघे

**●नाव** - **श्री. सदानंद त्र्यंबक केंघे, पुणे**
**देणगी** - रु. १०,००,०००/-
**दिनांक** - २२.१२.२०२५
**निमित्त** - मातोश्री कै. सिंधुताई त्र्यंबक केंघे यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ११)
**विनियोग**-देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी


श्री. प्रकाश ब्राह्मणकर

**●नाव** - **श्री. प्रकाश बाबुराव ब्राह्मणकर, (मा. वि.), जळगाव**
**देणगी** - रु. ७५,०००/-
**दिनांक** - १२.१२.२०२५
**निमित्त** - माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी


वत्सला ठाकूर

**●नाव** - **प्रेमा ठाकूर व पुष्पा धुमाळ, पुणे**
**देणगी** - रु. ६०,००१/-
**दिनांक** - ८.१२.२०२५
**निमित्त** - कै. वत्सला बापूराव ठाकूर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग शैक्षणिक मदत


माधव धाक्रस

**●नाव** - **श्री. चारूदत्त धाक्रस, ठाणे**
**देणगी** - रु. ५०,०१३/-
**दिनांक** - ३०.१२.२०२५
**निमित्त** - कै. माधव पुरुषोत्तम धाक्रस (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द १२)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग शैक्षणिक मदत


सदानंद जावळेकर

**●नाव** - **श्री. धनंजय सदानंद जावळेकर, युएसए**
**देणगी** - रु. ५०,००१/-
**दिनांक** - २०.१२.२०२५
**निमित्त** - वडील कै. सदानंद रामचंद्र जावळेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●नाव - **डॉ. संजयकुमार मोतीराम गायकवाड, (प्राचार्य कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे)**
देणगी - रु. ५०,०००/-
दिनांक - ५.१२.२०२५
निमित्त - कै. मोतीराम संभाजी गायकवाड यांचे स्मृतिदिनानिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●नाव - **राष्ट्र तेज मंच, वाशी, मुंबई**
देणगी - रु. २५,०००/-
दिनांक - ११.१२.२०२५
निमित्त - सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


दिलीप कापसे

●नाव - **श्रीमती नीलिमा दिलीप कापसे, पुणे**
देणगी - रु. २१,०००/-
दिनांक - ९.१२.२०२५
निमित्त - कै. दिलीप भालचंद्र कापसे यांचे स्मृतिदिनानिमित्त
विनियोग - देणगी रु. २०,०००/- व्याज विनियोग शैक्षणिक मदत उर्वरित रु. १,०००/ विनियोग शैक्षणिक मदत

●नाव - **मा. ट्रस्टी एन. जी. भोसले चॅरिटेबल ट्रस्ट**
देणगी - रु. २०,०००/-
दिनांक - २४.१२.२०२५
निमित्त - सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी रु. १५,०००/- विनियोग संस्थावाढीसाठी उर्वरित रु. ५,०००/- विनियोग अन्नदान

●नाव - **श्री. रमेश भास्कर ढमढेरे, पुणे**
देणगी - रु. २०,०००/-
दिनांक - ३१.१२.२०२५
निमित्त - कै. भास्कर हरी ढमढेरे व कै. नरेश भास्कर ढमढेरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (पौष वद्य ५)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●नाव - **श्री. चारूदत्त गोविंद बेलसरे, पुणे**
देणगी - रु. १७,०००/-
दिनांक - २.१२.२०२५
निमित्त - कै. गोविंद पांडुरंग बेलसरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


अनिकेत जाधव

●नाव - **श्रीमती हेमा हनुमंत जाधव, पुणे**
देणगी - रु. १६,०००/-
दिनांक - १६.१२.२०२५
निमित्त - कै. अनिकेत हनुमंत जाधव यांचे जयंतीनिमित्त (१६ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


भास्कर यादव


●नाव - **श्री. अर्णव वज्रदेही यादव, पुणे**
देणगी - रु. १५,०००/-
दिनांक - १.१२.२०२५
निमित्त - कै. भास्कर एकनाथ यादव (मा. वि.) यांचे जयंतीनिमित्त (१२ डिसेंबर)

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. गोविंद नारायण पुरंदरे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ५.१२.२०२५
**निमित्त** - कै. नारायण विष्णु पुरंदरे (मार्गशीर्ष वद्य २)
कै. शालिनी नारायण पुरंदरे (वैशाख वद्य ३०)
कै. रुक्मिणी नारायण पुरंदरे (माघ शुध्द ४) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. संजय शिवाजीराव काकडे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २६.१२.२०२५
**निमित्त** - कै. वैशाली संजय काकडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६जानेवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **डॉ. श्रीपाद जोशी, जत, सांगली**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - १६.१२.२०२५
**निमित्त** - कै. उषा श्रीपाद जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


डॉ. प्रेमानंद पैदुंघट

●**नाव** - **डॉ. सौ. वर्षा नितिन पैदुंघट, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - १२.१२.२०२५
**निमित्त** - डॉ. कै. प्रेमानंद पैदुंघट यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मिलिंद एम. अमृतकर, युएसए**
**देणगी** - रु. ११,०००/-


मधुकर अमृतकर व सुलभा अमृतकर

**दिनांक** - १६.१२.२०२५
**निमित्त** - कै. मधुकर शंकर अमृतकर(५ मार्च)
कै. सुलभा मधुकर अमृतकर (२८ जानेवारी) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**


प्रभा शेंदुर्णीकर

●**नाव** - **श्री. शशिकांत दत्तात्रय जोशी, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ६.१२.२०२५
**निमित्त** - कै. कु. प्रभा सखाराम शेंदुर्णीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष वद्य २)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग मिष्टान्न


बाळासाहेब धायबर

●**नाव** - **श्री. विवेक बाळासाहेब धायबर, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - कै. बाळासाहेब यशवंत धायबर (१९ ऑक्टोबर) यांचे स्मृतिदिनानिमित्त

**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान


गजानन संत

**●नाव** - **ॲड. ज्ञानराज गजानन संत, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. ६,००१/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - कै. गजानन रंगनाथ संत (मा. वि.) यांचे जयंतीनिमित्त (११ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न (सकाळ व रात्री) शेवयांची खीर आणि जिलेबीचे मिष्टान्न

**●नाव** - **डॉ. संजय रामचंद्र भार्गवे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १५.१२.२०२५
**निमित्त** - कै. रामचंद्र गोविंद भार्गवे व कै. मंगला रामचंद्र भार्गवे यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष वद्य १२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


कमल देशपांडे

**●नाव** - **कु. उज्ज्वला रामचंद्र देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १७.१२.२०२५
**निमित्त** - कै. श्रीमती कमल रामचंद्र देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **डॉ. अरुण नरहर पुराणिक, पुणे**
**देणगी** - रु. ६,४००/-
**दिनांक** - १९.१२.२०२५
**निमित्त** - कै. डॉ. दत्तात्रेय वामन अत्रे (२३ डिसेंबर) कै. डॉ. अक्षय दत्तात्रय गंभीर (२४ डिसेंबर) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

**●नाव** - **श्रीमती सुचेता बद्रीनारायण खरे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १५.१२.२०२५
**निमित्त** - कै. बद्रीनारायण खरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२३ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **श्रीमती रोहिणी रघुनाथ उमराणी, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १६.१२.२०२५
**निमित्त** - कै. रघुनाथ गजानन उमराणी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **मा. विश्वस्त हरीमालिनी जोशी ट्रस्ट, सातारा**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १६.१२.२०२५
**निमित्त** - कै. हरी केशव जोशी यांचे जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


उत्तमराव कुलकर्णी

●**नाव** - **श्री. रमेश उत्तमराव कुलकर्णी, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २७.१२.२०२५
**निमित्त** - कै. उत्तमराव राणोपंत कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

●**नाव** - **श्री. गिरीश श्रीधर लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - २७.१२.२०२५
**निमित्त** - कै. सुधाबाई विठ्ठल लिमये यांचे स्मृतिदिनानिमित्त (पौष शुध्द ९)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●**नाव** - **श्री. शरदचंद्र विश्वनाथ राजर्षी, पुणे**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - ४.१२.२०२५
**निमित्त** - कै. विश्वनाथ त्र्यंबक राजर्षी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. विनिता मोहन चिंचणीकर, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १७.१२.२०२५


सुहासिनी मालशे

**निमित्त** - कै. व्यंकटेश गणेश चिंचणीकर (३१ ऑक्टोबर)
कै. श्रीधर महादेव मालशे (१४ डिसेंबर)
कै. सौ. सुहासिनी श्रीधर मालशे (१८ ऑक्टोबर)
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. अतुल अशोक पुरंदरे, पुणे**
**देणगी** - रु. २,१०१/-
**दिनांक** - २३.१२.२०२५
**निमित्त** - कै. सुधा सदाशिव पुरंदरे यांचे जयंतीनिमित्त (२५ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. सुरेखा मिलिंद धायगुडे, पुणे**
**देणगी** - रु. २,००२/-
**दिनांक** - २५.१२.२०२५
**निमित्त** - कै. जनार्दन एकनाथ धायगुडे
कै. सुमती जनार्दन धायगुडे
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**


जयश्री पळसुले

●**नाव** - **कु. शुभा श्रीकृष्ण पळसुले, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ३.१२.२०२५
**निमित्त** - कै. सौ. जयश्री श्रीकृष्ण पळसुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (४ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती श्रध्दा दिलीप पाठक, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ५.१२.२०२५
**निमित्त** - बहिण कै. आशा उदय कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (६ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान



संजीव नेवगी

●नाव - श्रीमती शैला संजीव नेवगी, पुणे
देणगी - रु. २,०००/-
दिनांक - ८.१२.२०२५
निमित्त - कै. संजीव सत्येंद्र नेवगी यांचे स्मृतीदिनानिमित्त (९ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●नाव - श्रीमती वर्षा मोहन रानडे, पुणे
देणगी - रु. २,०००/-
दिनांक - ८.१२.२०२५
निमित्त - कै. मोहन जनार्दन रानडे यांचे जयंतीनिमित्त (१४ जानेवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●नाव - श्री. चंद्रशेखर नारायण सोवनी, पुणे
देणगी - रु. १,५००/-
दिनांक - ११.१२.२०२५
निमित्त - कै. श्रीमती सुमती नारायण सोवनी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१७ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. श्रीकांत श्रीरंग खासनीस पुणे
देणगी - रु. १,५००/-
दिनांक - १५.१२.२०२५
निमित्त - आप्तेष्टांचे पुण्यस्मरणार्थ (१० जानेवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


नारायण ओक

●नाव - श्री. सुरेश नारायण ओक, पुणे
देणगी - रु. २,०००/-
दिनांक - १७.१२.२०२५
निमित्त - कै. नारायण व्यंकटेश ओक यांचे जयंतीनिमित्त (१७ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


ॲड.एस.एन.चंद्रचूड

● नाव - ॲड. एस. एन. चंद्रचूड, (मा. वि.) पुणे
देणगी - रु. १,००१/-
दिनांक - १९.१२.२०२५
निमित्त - प्रतिमहाप्रमाणे सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●नाव - कुमारी ऐश्वर्या अमोद साने, पुणे
देणगी - रु. २,०००/-
दिनांक - २५.१२.२०२५
निमित्त - आजी कै. शैला भालचंद्र केळकर यांचे जयंतीनिमित्त (७ जानेवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


विष्णू पन्हाळे

●नाव - श्री. धर्मेंद्र विष्णू पन्हाळे, पुणे
देणगी - रु. २,०००/-
दिनांक - ३०.१२.२०२५
निमित्त - कै. विष्णू नाना पन्हाळे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१ जानेवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

●**नाव** - **सौ. नीता विनय जोशी, मुंबई**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ५.१२.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी (चि. विनित जोशी यांस नोकरीमिळाल्यामुळे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. प्रणव रमेश करमरकर, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - ७.१२.२०२५
**निमित्त** - कै. रमेश शंकर करमरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **सौ. अधिती अनिरुध्द परचुरे, पुणे**
**देणगी** - रु. ७५०/-
**दिनांक** - ८.१२.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. अरविंद मनोहर मुजुमदार, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १.१२.२०२५
**निमित्त** - कै. मनोहर शंकर मुजुमदार यांचे जयंतीनिमित्त (१५ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. रविंद्र सुरेश सप्तर्षी, मुंबई**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १८.१२.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**


●**नाव** - **मा. विश्वस्त आर. के. कंरदीकर मेमोरियल ट्रस्ट, पुणे**
**देणगी** - रु. २५०/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - कै. आर. के. करंदीकर व कै. श्रीमती इंदिराबाई आर. करंदीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **मा. ट्रस्टी एच. आर. नगरकर एस. व्ही. निधी, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - कै. एच आर. नगरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्रीमती रेखा विश्वनाथ ठकार, पुणे**
**देणगी** - रु. १५१/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - कै विश्वनाथ गोविंद ठकार यांचे स्मृतिदिनानिमित्त (१३ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती ज्योती सुधीर करंदीकर, पुणे**
**देणगी** - रु. १००/-
**दिनांक** - २३.१२.२०२५
**निमित्त** - कै सुधीर रघुनाथ करंदीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वाढदिवसानिमित्त व विवाह वाढदिवसानिमित्त दिलेल्या देणग्या**


श्री. मानसिंग काळंगे

**●नाव - श्री. मानसिंग बाबुराव काळंगे, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ७१,०००/-
**दिनांक** - ३.१२.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव - श्री. मारुती दशरथ मुळे, पुणे**
**देणगी** - रु. ५,५५१/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - चि. विआंश प्रसाद मुळे याच्या ५ व्या वाढदिवसानिमित्त (११ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. श्रीकृष्ण गदाधर नातू, पुणे**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - ३.१२.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. निखिल अरविंद गजेंद्रगडकर, पुणे**
**देणगी** - रु. ३,००१/-
**दिनांक** - १६.१२.२०२५
**निमित्त** - चि. ऋत्विक निखिल गजेंद्रगडकर याचे वाढदिवसानिमित्त (१७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - सौ. सुलेखा जगदीश खराडे, नवी मुंबई**
**देणगी** - रु. २,५००/-
**दिनांक** - ८.१२.२०२५
**निमित्त** - कु. जिजा सुजय खराडे हिच्या ५ व्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. अभिजीत अरूण पाठक, (मा. वि.), संभाजीनगर**
**देणगी** - रु. १,१००/-
**दिनांक** - १७.१२.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**●नाव - श्री. संतोष दौलत गाडेकर (मा. वि.), अहिल्यानगर**
**देणगी** - रु. १,१००/-
**दिनांक** - २६.१२.२०२६
**निमित्त** - चि. सार्थक संतोष गाडेकर याचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न


श्री. अर्जुन जावळे

**●नाव - श्री. अर्जुन उध्दवराव जावळे, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ३१.१२.२०२५
**निमित्त** - स्वतःचे वाढदिवसानिमित्त (१० ऑक्टोबर)
**विनियोग** - देणगी माजी विद्यार्थीनिधीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्री. शशिकांत ज्ञानेश्वर महाजन, (मा. वि.), सोलापूर**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - ११.१२.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. मारुती गुणाजी घडशी, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - २३.१२.२०२५
**निमित्त** - पत्नी सौ. शारदा मारूती घडशी यांचे वाढदिवसानिमित्त (१ जानेवारी)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**दि. १५.१०.२०२५ ते १२.११.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

● **नाव** - **पुणे विद्यार्थी गृह, माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग, घाटकोपर**
**देणगी** - रु. १९,०००/-
**दिनांक** - ५.१.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - मराठी माध्यमातील ८ आणि इंग्रजी माध्यमातील ७ गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी रु. १५,०००/-
(शिष्यवृत्ती प्रत्येकी रु. १,०००/-)
तसेच विद्याभवन शाळेच्या ग्रंथालयात पुस्तके खरेदीसाठी रु. ४,०००/-

***

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

● **स्वयंप्रकाशी चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे**
डॉ. सुनील काळे यांच्या वाढदिवसानिमित्त
गहू ५४० कि., रु. २१,६००/-

● **श्री. महेश बेहेरे, पुणे**
कै. सोनाली चंद्रकांत बेहेरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त
जिलेबी ५ कि., रु.१,०००/-

● **श्री. अजित भट, पुणे**
दत्तजयंतीनिमित्त केळी २० कि., रु. ७०१/-

● **श्री. शशिकांत दत्तात्रय जोशी, पुणे**
कै. कु. प्रभा सखाराम शेंदुर्णीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
पुस्तके - सीतायन, वाकक्षेत्र, आजीवन विद्या, रु. ६२०/-

● **श्री. प्रणव रमेश करमरकर, पुणे**
सर्वपित्री अमावास्या व कै. रमेश शंकर करमरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
रवा ५ कि., साखर ५ कि. रु. ४५०/- ***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगांव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**उपाकार्याध्यक्ष – श्री. अमोल जोशी**
**दि. १.१२.२०२५ ते ३१.१२.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

वस्तूरूप देणगी

● **नाव** - **श्री. राकेश बधान, नाशिक**
**देणगी** - रु. ७०,०००/- किंमतीचे आधुनिक झेरॉक्स मशीन
**दिनांक** - २६.१२.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी ***

## ⁂ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ⁂





प्राथमिक इंग्रजी विभाग दि. २० जानेवारी २०२६ रोजी
प्रमुख पाहुणे श्री. रामदासजी जगताप (अतिरिक्त जिल्हाधिकारी, सिडको, नवी मुंबई)
यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत श्री. गिरीश म्हात्रे (नवनिर्वाचित नगरसेवक)
तसेच उजवीकडे विशेष अतिथी श्रीमती गुंजनजी भाटिया (दूरचित्रवाणी अभिनेत्री) यांचे स्वागत करताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ आदी मान्यवर



माध्यमिक इंग्रजी विभाग दि. २१.१.२०२६ रोजी प्रमुख पाहुणे
श्री. सुनीलजी पवार (अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका)
यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत
उपायुक्त श्री. किसनराव पलांडे व नगरसेविका स्वप्ना गावडे



विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
दि. १९ जानेवारी २०२६ रोजी प्रमुख अतिथी
श्री. संदीप विष्णू निचित, (अपर जिल्हाधिकारी
तथा मुख्य भूमापन अधिकारी, सिडको, नवी मुंबई) यांचा
सन्मान करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
समवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ



प्राथमिक मराठी विभाग
दि. २३ जानेवारी २०२६ रोजी
प्रमुख पाहुणे श्री. अशोकजी कडूस
(नवी मुंबई महानगरपालिका
शिक्षणाधिकारी)
यांचा सन्मान करताना
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
समवेत कार्यवाह श्री. संजय गुंजाळ
व कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
[Publication Date 13.2.2026 Posting Date 15.2.2026]

Periodical Post

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ✻
## (पूर्व प्राथमिक इंग्रजी विभाग)







↑ दि. २७ जानेवारी २०२६ स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुण्या श्रीमती सुनीता भिडे (माजी मुख्याध्यापिका, विद्याभवन हायस्कूल नं. २) यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत माजी कार्याध्यक्ष श्री. कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ आणि डॉ. मीनल भोळे

← विशेष अतिथी डॉ. मीनल भोळे (माजी सहा. शिक्षिका, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय) यांचे स्वागत करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, समवेत डावीकडून समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव आणि श्रीमती सुनीता भिडे

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦
▣ पुणे शाखा – (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा – (०२२) २५०६२३२२, फॅक्स : (०२०) २५०६४९३५
▣ नवी मुंबई (नेरूळ) शाखा – (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा – (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरूळ शाखा – (०२५३) २५३४२९१
▣ तळेगाव अंजनेरी शाखा – (०२५९४) २२२२२७
कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

This monthly Samachar is printed on behalf of
Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge
at Maharashtra Mudranshala Chhapkhana,1786, Sadashiv Peth, Pune 411030
and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.
Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी
महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून
पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.



संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे